मंगळवार, १७ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 17 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-73 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# ४०० वर्षांपासून दुर्गेची दशमुखी मूर्ती भग्नावस्थेत पडून

## लोकप्रतिनिधींसह जिल्हा प्रशासनाला नवरात्रोत्सवात सद्बुद्धी प्राप्त होईल का?

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** संपूर्ण देशात मातृशक्तीच्या पुजनाचे पर्व अर्थात नवरात्रोत्सव अतिशय आनंदात आणि भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे. सगळीकडे दुर्गादेवी, शारदादेवीची स्थापना करून पूजाअर्चा करण्यात येत आहे. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील भिवापूर परिसरात मात्र दुर्गेची दशमुखी मूर्ती तब्बल चारशे वर्षांपासून आजही उन, वारा, पावसाचा मारा खात उघड्यावर भग्नावस्थेत पडली आहे. गोंड राजाच्या काळात त्यांच्या विविध लोकोपयोगी कार्य, त्यांनी बांधलेले परकोट, गड किल्ले या सगळ्याने प्रभावित होऊन तत्कालीन नगर सेठ भैयप्पा वैश्व यांनी १६ व्या शतकात भव्य मंदिर निर्माण करण्याच्या हेतूने प्रचंड विशाल अशा मोठ्या मूर्त्या निर्माण करण्यास सुरुवात केली. गपणती, भिम, शंकर, हनुमान, नंदी, नाग, मछली, पिंड, गजराज, देवीची मूर्ती आणि यासोबतच दुर्गेची दशमुखी मुर्ती अशा विविध मूर्त्या याठिकाणी तयार करण्यात आल्या. पण दुर्दैवाने कालांतराने मंदिरिचे निर्माण होण्यापूर्वीच भैयप्पा वैश्व यांचा मृत्यू झाला आणि मूर्ती तयार करण्याचे हे काम थांबले. तेव्हापासून म्हणजेच सोळाव्या शतकापासून या ठिकाणी असलेल्या या मूर्त्या अशाच उघड्यावर पडलेल्या आहेत. पुरातत्व विभागाने नेहमीप्रमाणेच या ठिकाणी आपला सामान्य नागरिकांसाठी निषिद्ध क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत असलेला बोर्ड लावला आहे. पण ना पुरातत्व विभाग, ना आजवर झालेले आमदार, खासदार, ना जिल्हा प्रशासन यापैकी कोणीही या भव्य मुर्त्यांना संरक्षण दिले, ना मंदिराची निर्मिती झाली. या ठिकाणी असलेली दुर्गेची दशमुखी मुर्ती ही कित्येक वर्ष रावणाचा पुतळा म्हणून समजण्यात येत होता आणि रावणाचा पुतळा म्हणून दसऱ्याला या पुतळ्याला परिसरातील लोक दगड फेकून मारायचे. यामुळेच या सुंदर कोरीव अशा दुर्गा मूर्तीच मोठे नुकसान तर झाले आहेच. शिवाय चारशे वर्षांपासून उघड्यावर पडलेल्या असल्याने यातील ही मूर्ती भंग पावली असून अनेक ठिकाणी या मुर्तीला भेगा पडल्याचे दिसत आहे. तब्बल २३ फूट उंच आणि १८ फूट रुंद अशा दुर्गेच्या या मूर्तीच्या डाव्या हातात राक्षसाचे छाटलेले मुंडके तर उजव्या हातात खडग आहे. सोळाव्या शतकातील नगर शेठ भैयप्पा वैश्व यांच्या कल्पकतेतून साकारलेल्या या मूर्त्या त्यांच्या मनातील भव्य मंदिर निर्माणापूर्वीच त्यांच्या मृत्यूमुळे चारशे वर्षांपासून आजही उघड्यावर उपेक्षित पडलेल्या आहेत.







या मुर्त्यांना न्याय मिळो आणि या दुर्गेच्या दशावतारी मुर्तीचेही नवरात्र येणाऱ्या काळात साजरे व्हावेत हीच समस्त चंद्रपूरकरांची ईच्छा आहे. त्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींसह जिल्हा प्रशासनाला या नवरात्रोत्सवात सद्बुद्धी प्राप्त होवो असा विचार या परिसरातील नागरिक व्यक्त करतात.

# नगर-आष्टी रेल्वेला भीषण आग

## ७ डबे जळून भस्मसात : सुदैवाने जीवितहानी नाही

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी : अहमदनगरहून आष्टीकडे जाणाऱ्या प्रवासी डेमू रेल्वेला सोमवारी आग लागून ७ डबे जळून भस्मसात झाले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही किंवा कोणास दुखापतही झाली नाही. घटना आज, सोमवारी दुपारी ३ च्या सुमारास नगर शहराजवळील शिराढीण ते वाळुंज फाटा या दरम्यान घडली. या रेल्वेत थोडेच प्रवासी होते. प्रवाश्यांनी जीवाच्या भीतीने, वेग कमी झाल्यानंतर धावत्या रेल्वेतून उड्या मारल्या.**




सध्या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. त्यातील पहिल्या टप्प्याचे, नगर ते आष्टी या रेल्वेरुळाचे काम पूर्ण होऊन गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये ही रेल्वे सुरु करण्यात आली. सुरुवातीला सकाळी व संध्याकाळी अशा दोन फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र प्रवाशांचा प्रतिसादच नसल्याने काही दिवसातच एक फेरी कमी करण्यात आली. आज दुपारी नगरहून आष्टीकडे जाणाऱ्या रेल्वे गाडीच्या पहिल्याच डब्याला आग लागली व ती पसरत गेली. राष्ट्रीय महामार्गचे काम करणारे रस्त्यावरील मजूर व वाळुंज ग्रामस्थांच्या लक्षात आग लागल्याची बाब आली. त्यांनी आरडाओरडा करत माहिती दिली तसेच रेल्वे प्रशासन व नगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाला कळवले. मनपा तसेच संरक्षण विभागाच्या सीक्यूएव्ही, व्हीआरडीई व नगर एमआयडीसीचे सहा बंब आग विझवण्यासाठी धावले. तोपर्यंत ७ डबे आगीच्या भक्षस्थानी पडले होते. सायंकाळी ४:१५ च्या सुमारास आग विझवण्यात अग्निशामन दलाच्या यंत्रणांना यश आले त्यानंतर रेल्वे च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उर्वरित डबे बाजूला काढले या घटनेत कोणासही दुखापत झालेली नाही मात्र आग कशामुळे लागली हे रेल्वे प्रशासनाने सायंकाळी उशिरापर्यंत स्पष्ट केले नव्हते. गार्डच्या बाजूची ब्रेक व्हॅन व त्याला लागून असलेले सहा डबे जळून खाक झाले. दौंड होऊन घटनास्थळी रेल्वे अपघात मदत विभागाची (एआरटी) यंत्रणा पाठवण्यात आली होती. रेल्वे इंजिनला लागूनच ऑईलची टाकी होती, या टाकीजवळ आग पोहोचण्यापूर्वीच ती वीजवण्यात आली. परिणामी टाकीचा स्फोट झाला नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

# १६ कोटींचा अमली पदार्थांचा साठा जप्त


आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** येथील चिंचोळी एमआयडीसीमध्ये एका बंद कारखान्यावर मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापेमारी केली. यात अंदाजे १६ कोटी रूपये किंमतीचा ८ किलो उत्तेजक एमडी औषधांचा साठा जप्त केला. तसेच मोठ्या प्रमाणावर कच्चा मालही हस्तगत केला.

या कारवाईने अमलीपदार्थ उत्पादन क्षेत्रात सोलापूरचे नाव मुंबईसह परदेशाला जोडले गेल्याचे पुन्हा एकदा उजेडात आले आहे. मुंबई पोलीस गुन्हे अन्वेषण शाखेच्या कक्ष क्र. ९ चे प्रमुख दया नायक यांच्या पथकाने चिंचोळी एमआयडीसीतील एका बंद कारखान्याचा पर्दाफाश करून मोठी कारवाई केली. १६ कोटी रूपये किंमतीच्या ८ किलो एमडी ड्रग्जबरोबर त्यासाठी लागणारा कच्चा मालही या कारवाईत सापडला. दोघे गवळी बंधू एमडी ड्रग्ज विक्रीसाठी मुंबईत आले असताना त्यांना पकडण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबई पोलिसांनी चिंचोळी एमआयडीसीत येऊन पुढील कारवाई केली. या कारवाईमुळे स्थानिक पोलीस आणि अन्न औषध प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


## ऐसी अक्षरे रसिके




महर्षी व्यासांनी जे एक लक्ष श्लोकांचं प्रचंड मोठा आवाका असलेलं महाभारत सांगितलं, ते लिहून घेणं काही येरागबाळ्याचं काम नव्हतंच. व्यासांनी ते न थांबता सांगितलं आणि गणपतीनं सुद्धा प्रचंड वेगानं ते अक्षरबद्ध केलं. आज आपण संगणकावर किंवा मोबाईलवर किंवा अन्य कोणत्याही माध्यमावर जेवढ्या वेगानं टाईप करतो, त्यापेक्षाही त्याचा ( गणपतीचा ) लिहिण्याचा वेग अधिक असावा.

आज आपल्याकडे लिहिण्यासाठी कितीतरी वेगवेगळे पर्याय आणि साधनं उपलब्ध आहेत. पण पूर्वीचा मानव कशाकशाचा वापर करीत असेल ? अणकुचीदार दगड, झाडाची काडी किंवा डहाळी, पक्ष्याचं किंवा मोराचं पीस इ. आणि पुढे जसजशी प्रगती होत गेली तेव्हा बोरू, टाक, पेन्सिल, पेन इ. मग टाईपरायटर, संगणक इ. लिहिण्यासाठी तो पूर्वी भूर्जपत्र, कापड इ. चा वापर करायचा. मग पुढे कागदाचा शोध लागला. त्यापूर्वी मानवाने गुहेत विविध चित्रं काढली. पानाफुलांचे रंग भरले. अशा रितीने आधी चित्रलिपीचा जन्म झाला. लिपीचा शोध लागल्यावर पुढे त्याने दगडावर मजकूर कोरायला सुरुवात केली. त्यातूनच शिलालेखांचा जन्म झाला. राजेमहाराजांचा इतिहास नाणी, शिलालेख, आज्ञापत्र, बखरीच्या रूपाने उपलब्ध झाला. व्यापाऱ्यांना हिशेब लिहिण्याची सोय झाली.

वैदिक वाङ्मय पूर्वी मौखिक स्वरुपात होते. लिहिण्याचा शोध लागल्यामुळे ते लिखित स्वरूपात आले. कल्पना करा की लेखनाचा शोध लागला नसता तर ! ते सगळे ज्ञान त्या त्या लोकांबरोबरच नाहीसे झाले असते. प्राचीन ज्ञानाच्या पायावर मानवाच्या पुढील प्रगतीची इमारत उभी राहिली. रामायण, महाभारत, भगवद्गीता, भागवत यासारखे ग्रंथ, पाणिनीचे व्याकरण, भरतमुनींचे नाट्यशास्त्र आणि इतरही सगळे मौल्यवान ग्रंथ आपल्यापर्यंत पोहोचले ते केवळ लेखनकला मानवाला अवगत झाल्यामुळे. इराकमधील मेसोपोटेमिया या इ.स. पू. ३४०० वर्षांपूर्वीच्या सुमेरियन संस्कृतीत लेखनकला विकसित झाली असे सांगितले जाते. पण त्यापूर्वीही दोन शतके ती इजिप्तमधील नाईल नदीच्या खोऱ्यातील लोकांना अवगत होती असे मानले जाते इतकी ती प्राचीन आहे.



## आनंदी पहाट

## व्याख्यात्यांच्या सखोल व व्यापक दृष्टिकोनाचे महत्त्व

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अभ्यासक्रमाच्या एकूण रचनेवर, त्यांतील विविध विषयांवर आधारित सखोल अभ्यास आणि अनुभव असलेल्या शिक्षकांची निवड केली जाते. त्यासाठी विविध निकषांसह एकत्रीकरणाची चौकट सेट केली जाते.

शिक्षकांच्या वैयक्तिक संपर्कांवर आधारित लोकांची निवड जलद कार्य करते परंतु ती कदाचित मर्यादित असू शकते. यातील अंतर भरून काढण्यासाठी सिद्ध आणि नवीन व्याख्याते यांचे मिश्रण, संयुक्तीकरण शिफारसीय आहे. सापेक्ष साधेपणा असूनही या स्वरूपाची पूर्ण क्षमता वापरण्यासाठी व्याख्यानाची काळजीपूर्वक तयारी करणे आवश्यक आहे. अपेक्षा स्पष्ट करण्यासाठी आणि व्याख्यान अधिकाधिक फलदायी करण्यासाठी शिक्षकांची, प्राध्यापकांची, व्याख्यात्यांची विस्तृत माहिती मिळविणे अत्यंत महत्त्वाचे असते. अधिक सखोल दृष्टीकोन व्याख्यात्यांना अभ्यासक्रमाच्या डिझाइन प्रक्रियेत आधीच सहभागी होऊ देईल. आदर्शपणे, विद्यार्थी प्रत्येक व्याख्यानासाठी काही निवडक वाचन करून तयारी करतात. व्यावसायिकांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा इष्टतम वापर करण्यासाठी, व्याख्यात्यांना विद्यार्थ्यांच्या कामावर अभिप्राय देण्यास सांगितले जाऊ शकते. हे आगाऊ कळवले पाहिजे आणि त्यासाठी पुरेसा वेळ राखून ठेवला पाहिजे. विद्यार्थी आणि शिक्षक, प्राध्यापक यांच्यातील देवाणघेवाण एका महत्त्वाच्या चर्चेसाठी एका ठराविक, विशिष्ट जागेद्वारे वाढू शकते. संबंधित प्रश्न विद्यार्थ्यांनी आधीच तयार केले पाहिजेत, विशेषतः जेव्हा त्यांना गंभीर दृष्टिकोनातून विचारले जाते. प्रत्येक व्याख्यात्यांच्या भेटीनंतर, अभ्यासक्रमाच्या विषयाच्या शैक्षणिक दृष्टीकोनाशी जोडण्यास मदत करतो त्यामुळे विद्यार्थ्यांना चिंतनासाठी पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. विद्यार्थ्यांनी विविध संशोधने आणि विषयांवर प्रकल्प हाती घेणे आणि प्राध्यापकांच्या बरोबर चर्चा करणे सहज शक्य होऊ शकते. प्राध्यापक अनेकदा त्यांच्या माहितीतील कंपन्या आणि इतर संस्थांमध्ये, संघटनांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या संधी देतात. विद्यार्थ्यांसाठी न सापडलेल्या शेकडो संधी असतात, ज्या त्यांना प्राध्यापकांशी, व्याख्यात्यांशी संवाद साधल्यानंतर कळतात आणि मिळतात.



आधुनिक केसरी

**अद्वैती जाणावे | परतत्व ||**
कर्माशी ईमान | ठेऊनी वागावे ||
अनुभवे सांगावे | गोष्टी चार ||१||
करू नये कधी | अकर्माशी संग ||
साधनेचा भंग | होतो जाण ||२||
लागावी समाधी | देहाला आत्म्याची ||
आत्मरूप ज्ञानाची | ओढ लागो ||३||
स्वार्थाचा नसावा | स्पर्श या मनाला ||
परमार्थ जीवाला | ज्ञात व्हावा ||४||
आचार विचार | बुध्दीने सांधावे ||
अद्वैती जाणावे | परतत्व ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

जन्म मायेचे मैंदावें । जन्म क्रोधाचें विरावें ।
जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ॥ ७ ॥
जन्म जिवाचें मीपण । जन्म अहंतेचा गुण ।
जन्म हेंचि विस्मरण । ईश्वराचें ॥ ८ ॥
जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी ।
जन्म काळाची कांकडी । भक्षिताहे ॥ ९ ॥




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पूर्ण ज्ञान दर्शन मिले, सो सद्गुरु पद पाय ।
धन्य धन्य सोइ हंस है, तरण व तारण
आय ।।५९।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/५९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सद्गुरूंचे दर्शन झाल्यावरच पूर्ण ज्ञान आणि सद्गुरूपद प्राप्त होते. हाच सद्गुरू पदाधिकारी आत्मा कृत्कृत्य होऊन जीवांना भवसागरातून तारणारा आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (दुसरी माळ)

आधुनिक केसरी

थोर पुरुषांच्या शांती मध्ये, ज्ञानी पुरूषांच्या विरक्तीमध्ये, ईश्वराची स्वतः ची ही शक्ति अत्यंत वासना रहित अवस्था प्राप्त करून घेऊन



आपले संस्कार, आचारविचार शुध्द ठेऊन अर्थार्जनाचे दैनिक कर्म करत असताना सतत मनामध्ये प्रामाणिक भाव ठेऊन,जो तिच्या वर भक्तिभाव ठेऊन कर्म करतो त्याला योग्य ते मार्गदर्शन करते ,आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी रस्ता दाखवण्याचे काम शारदा करते. म्हणून अशा श्री जगदंबेला वारंवार नमस्कार असो.


जय जगदंबे वाराही देवता शंभर वर्षांचे आयुष्याचे रक्षण करो. वैष्णवी माता-- धर्माचे रक्षण करो. चक्रधारिणी माते यश, कीर्ती, संपत्ती,वैभव आमच्या जवळ सतत असु दे आमच्या जवळ सतत चांगलीचं विद्या येऊ दे पाप करण्याची बुध्दी कधीही होऊ देऊ नकोस,सतत सदाचारणी कास हातात असू दे तुझ्या नामस्मरणात आम्ही अखंड बुडालेले असु दे. हे इंद्राणी माते माझ्या कुळाचे, मुलाबाळांचे रक्षण कर मैत्रभाव वृध्दिंगत होऊ दे हे चंडिका माते --आम्हाला दुध,तुप देतात त्या सर्व गाईगुरांचे तसेच पशूपक्षांचे रक्षण कर, आपल्या देशाचे रक्षण कर आपल्या देशातील पर्वत, नद्या, जंगल, दगड, मातीशेती, पशुधन,आकाश,समुद्र या सर्वांचं रक्षण कर भैरवी माते पतिपत्नीचें रक्षण कर, त्यांना सतत सन्मार्गाचा रस्ता दाखव,त्यांना सद्बुद्धीच्या मार्गाचा रस्ता दाखव. सदासर्वकाळ,माया परस्परांवर गाढ विश्वास,नैतिकता, आदर्श आचरण यांचा रस्ता दाखव. हे सुपथा माझ्या मार्गाचे रक्षण कर, माझ्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर कर,वाट चालताना तुझा कोमल हात मला पैलतीरावर न्यायला मदत करेन यांची खात्री आहे. क्षेमकारी माझ्या वाटेचे रक्षण कर, राजद्वारात सिंहासनावर बसलेल्या लक्ष्मी माते सदैव रक्षण कर माझ्या कुटूंबाचे रक्षण कर, माझ्या अल्प बुध्दीला जे जे वाटलं तशी शब्दरूपी ूजा बांधली आहे माते, ती पूजा मानून घे आई सेवेत काही कमी असेल तर माफ कर आई राधा उदो, ऊदो ज्या स्थानाच्या रक्षणाचा उल्लेख अनवधानाने माझ्याकडून राहिला असेल त्यासाठी भूमीवरील सर्व प्राणी मात्रांचे रक्षण कर देव, देश व धर्माचें रक्षण कर मला निर्भय कर, दोन्ही हाताने व शुध्द मनाने जे जे दुस-यास देता येईल ते ते देण्याची पात्रता मला दे माते. असा सदाचाराचा सौभाग्याचं, मुलाबाळांच्या उत्कर्षाचा जोगवा मी तुला मागते माते. तुम्ही जे जे मागाल ते ते देवी माता आपल्याला देणार आहे. पण त्यासाठी मनाने पवित्र व शुध्द भाव असणे महत्त्वाचे आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## विषयाची व लौकिकाची आस सोडावी

आधुनिक केसरी



आपण रामाचे झालो म्हणजे आपली काळजी त्याला लागते. आपण रामाचे व्हायला अडचण आमचीच. आवडच मुळी आपण विषयाची आणि लौकिकाची ठेवतो. साहजिकच, एकाची आसक्ति ठेवल्याने दुसऱ्याची विरक्ति येते. नोकरीच्या वेळेस आम्ही बायकामुलांना बाजूला सारून कामावर जातो ना ? मग साधनेच्या वेळी बायकोमुले आड येतात हे कारण का सांगावे ? बायको आणि पैका या दोन गोष्टी आमच्या आड येत असतात; असे आजवर अनेक संतांनी सांगितले. मग या निर्माण तरी का केल्या असे कोणी विचारतील. त्याला उत्तर म्हणजे, काड्याच्या पेटीने विस्तवही पेटविता येतो आणि घरही जाळता येते; त्याचा जसा आपण उपयोग करावा तसा तो होतो. खरे म्हणजे आम्हाला भगवंताची तळमळच लागत नाही. एकजण मला म्हणाला की, "मला प्रपंच टाकावासा वाटतो." मी त्याला म्हटले, "नुसता प्रपंच टाकण्याने तुला वैराग्य कसे येईल ? वैराग्याला नेहमी विवेकाची जोड लागते. तू आपला मीपणा टाकलास तरी खूप झाले. चांगले कर्म आड येत नाही असे थोडेच आहे ? वाईट कर्म कुणाला सांगण्याची तरी आपल्याला लाज वाटते, पण सत्कर्म अभिमानाने ज्याला त्याला सांगत सुटतो. 'मागील जन्मी पाप केले होते म्हणून या जन्मी हे भोगतो' असे म्हणतो; आणि 'आता चांगले कर्मे करतो म्हणजे पुढल्या जन्मी सुख लागेल' असे म्हणतो. म्हणजे जन्ममरण्याच्या फेऱ्यातून सुटण्याऐवजी त्याच्यात गुंडाळले जाण्यासारखेच झाले ! दुष्कर्मामुळे पश्चात्ताप होऊन एकदा तरी भगवंताची आठवण होईल; परंतु सत्कर्माचा अहंकार चांगल्या माणसालाही कुठे नेऊन सोडील याचा पत्ता लागणार नाही. राजासुद्धा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आपल्या संगतीला चांगला माणूस ठेवतो. भगवंताने उद्धवालाही 'सत्समागम कर' म्हणून सांगावे, याहून अधिक काय पाहिजे ? कडू कारले खाल्ले तर कडूपणाचीच प्रचीती होते मग विषयाच्या प्राप्तीने जीवन गोड कसे होईल ? 'प्रेम येईल तेव्हा भगवंताची भक्ति करीन' असे म्हणू नये. विषयासाठी आपण मरमर काम करतो आणि तेवढे करूनही सुख लाभत नाही' मग भगवंताचे नाव न घेता, प्रेम येत नाही हे म्हणणे किती वेडेपणाचे आहे ! लग्नाआधी मुलीला दहापाच जणांना दाखविली तरी, लग्न झाल्यावर ज्याप्रमाणे त्यांतला एकच नवरा असतो आणि बाकीच्यांची तिला आठवणही राहात नाही, त्याप्रमाणे, आम्ही एकदा रामाचे झालो, म्हणजे त्याच्याशी लग्न लावले, म्हणजे मग विषयांचे प्रेम कुठे आले ?

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १७ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# मीरा बोरवणकरांनी केलेल्या आरोपांची न्यायमूर्तीमार्फत चौकशी करा : पटोले

## चौकशी होईपर्यंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कार्यमुक्त करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी IPS अधिकारी मीरा बोरवणकर यांनी पुण्यातील येरवड्याच्या सरकारी जागेसंदर्भात केलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत. अजित पवार यांनी सरकारी जागा खासगी बिल्डरच्या घशात घालण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी आपल्यावर दबाव आणला होता असा गंभीर आरोप बोरवणकर यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केला आहे. मीरा बोरवणकर यांनी केलेल्या या गंभीर आरोपांची उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्यामार्फत चौकशी करावी आणि चौकशी होईपर्यंत अजित पवार यांना कार्यमुक्त करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मीरा बोरवणकर यांनी येरवड्याची पोलीस विभागाची जागा बिल्डरच्या घशात घालण्याचा तत्कालीन पालकमंत्र्यांचा प्रयत्न होता हा जो आरोप केला आहे, त्यावर सरकारला आम्ही अधिवेशनात जाब विचारणाच आहेत. पण चौकशी करा अशी मागणी केली तर सरकारच सरकारची चौकशी कशी करणार? या प्रकरणात 'दाल में कुछ काला है', असे नाहीतर सर्व डाळच काळी आहे. अजित पवार यांनी त्यांच्या जवळचा बिल्डर शाहीद बलवा याला सरकारी जमीन द्यावी म्हणून आपल्यावर कसा दबाव आणला हे बोरवणकर यांनी पुस्तकात लिहिले होतेच पण आज पत्रकार परिषद घेऊन त्यावर शिक्कामोर्तब करत गंभीर आरोप केले आहेत. सरकारमध्ये जर काही नैतिकता शिल्लक असेल तर त्यांनी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तीमार्फतच या प्रकरणी चौकशी केली पाहिजे तरच सर्व सत्य बाहेर येईल, असेही पटोले म्हणाले.

# हैदराबाद-जयपूर एक्स्प्रेस पूर्वनियोजित वेळेनुसार धावणार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** सणासुदीच्या काळातील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता भोपाळ येथील ब्लॉक रद्द करण्यात



आला आहे. त्यामुळे हैदराबाद-जयपूर एक्सप्रेस पूर्वनियोजित वेळेनुसार धावेल. भोपाळ रेल्वे विभागातील बुधनी-बरखेडा तिसरा मार्ग टाकण्याच्या कामासाठी 'नॉन इंटरलॉकिंग' कामासाठी 'ब्लॉक' लागू करण्यात आला होता. आता त्याची तारीख वाढवण्यात आली आहे. या कारणास्तव रतलाम रेल्वे विभागाच्या ज्या गाड्या १४ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत रद्द आणि वळवण्यात आल्या होत्या, त्या आता त्यांच्या नियमित वेळापत्रकानुसार धावतील. या रद्द झालेल्या गाड्यांमध्ये पूर्णा, अकोला, खंडवा, इटारसी मार्ग धावणारी गाडी क्र. १२७२० हैदराबाद-जयपूर एक्सप्रेस १६ ते २५ ऑक्टोबर व गाडी क्र. १२७१९ जयपूर-हैदराबाद एक्सप्रेस १८ ते २७ ऑक्टोबरदरम्यान पूर्वनियोजित वेळेवर धावणार आहे.

# पुणे पोलीस भरतीत बनावट प्रमाणपत्र; बीडमधील दहा जणांविरोधात गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मागील काही वर्षात पोलीस भरती प्रकरणात होणाऱ्या घोटाळ्यांची यादी वाढतच चालली आहे. दरम्यान, यात सतत बीड कनेक्शन समोर येत आहे. आता पुन्हा एकदा पुणे पोलीस भरतीत बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढणाऱ्या आरोपींमध्ये देखील बीडच्या आरोपींचा समावेश असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे, या प्रकरणी बीडमधील दहा जणांविरोधात पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हे सर्व प्रकल्पग्रस्ताचे बनावट प्रमाणपत्र बीड जिल्ह्यात तयार झाल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. 2021 मध्ये झालेल्या पुणे ग्रामीण पोलीस भरतीमध्ये बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढल्या प्रकरणी बीडमधील दहा जणांविरोधात पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धक्कादायक म्हणजे हे सर्व बोगस प्रमाणपत्र बीडमधून काढण्यात आल्याचे उघड झाल आहे. दरम्यान, या प्रकरणी पुणे पोलीस तपास करत आहे. त्यामुळे यात आणखीन काही आरोपींचे नावं समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, पोलीस भरतीत पुन्हा एकदा बीड कनेक्शन समोर आल्याने खळबळ उडाली आहे. 2021 मध्ये पुणे ग्रामीण विभागात पोलीस भरती घेण्यात आली होती. यामध्ये सहभागी होण्यासाठी अनेक उमेदवारांनी बीडमधून बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढल्याचं आता उघड झाले आहे. या प्रकरणी 10 जणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी देखील बीडमधून बोगस प्रमाणपत्र काढणाऱ्याविरोधात विदर्भात गुन्हे दाखल करण्यात आले होते. आता पुन्हा पुण्यामध्ये देखील हे बनावट प्रमाणपत्र पोलीस भरतीसाठी वापरल्याचे उघड झाला आहे.

# 'नो एंट्री' चुलीत गेला पक्ष अन् चुलीत गेले नेते'

## आरक्षणावरून राजकीय नेत्यांना मनूर गावात बंदी...!

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणीखुर्द :** मराठा समाजाला जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षांच्या नेत्यांनी गावात येवू नये येणार्याने आपली मर्यादा राखून गावात प्रवेश करावा, अशी टिप देत फलक वैजापूर तालुक्यातील मनुर येथे गावच्या प्रवेशद्वाराजवळ लावण्यात आला आहे. लावलेला फलक पाहता आरक्षणाच्या नावाखाली सरकार मराठा समाजाची दिशाभूल करत असल्याने समाज आक्रमक होत असल्याचे दिसून येत आहे.

जालना जिल्ह्यातील अंतरवाली सरटी येथे मनोज पाटील जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मागच्या आनेक दिवसापासूनलढा देण्यासाठी अमरण उपोषण जनजागृती सुरु केले आहे. या अमरण उपोषणामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे राजकीय वातावरण ढवळून निघाले असून या आंदोलनाचा फटका सत्ताधारी व विरोधी नेत्यांना बसत असून राजकीय नेत्यांना मराठा समाजाची धसकी घेवून नियोजित कार्यक्रम रद्द करावे लागले आहेत. त्याचबरोबर राज्यात अनेक ठिकाणी बंद, रास्ता रोको आंदोलन व अमरण उपोषणाचेही हत्यार उपसण्यात आले असले तरी सरकार ठोस निर्णय न घेता चर्चेचे गुह्राळ सुरु ठेवले आहे. आरक्षणाच्या मुद्यावरुन मनुर गावात शांततेत आंदोलन करण्यात आले. गावकरी तरुणाई आक्रमकपणे रस्त्यावर उतरल्याने मनात असलेली खदखदत



**आम्ही भूमिकेवर ठाम :** जोपर्यंत मराठा आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत कोणत्याही निवडणुकीत मतदान करणार नाही . तसेच कुठल्याही राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना गावात येऊ नाही . जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत हा आमचा निश्चय असणार आहे .

या निमित्ताने दिसून आली. एवढ्या आक्रमकपणे राज्यात आंदोलने होत असताना आरक्षण अद्यापही द्रष्टिक्षेपात असल्याचे वाटत नाही. त्यामुळे गावोगावी आंदोलनाची चळवळ उभी राहत असून. प्रत्येक गावात वेगवेगळ्या पध्दतीने आंदोलन करण्यात येत आहे. वैजापुर तालुक्यातील बाजार पेठेच मोठ गाव म्हणून ओळख असलेल्या मनुर गावात पुढाऱ्यांना गावबंदी आणिबहिष्कार टाकण्याची शपथच समाजबांधवांनी घेतली आहे. जोपर्यंत राज्य सरकार आरक्षण देणार नाही, तोपर्यंत आसे सुरूच ठेवणार असल्याची भूमिका मनुर येथील समाजबांधवांनी घेतली आहे. तसेच परिसरातील गावांमध्ये जनजागृती करण्यासाठी कार्यकर्ते भेटी घेत आहेत. आरक्षणाच्या मागणीसाठी मागील अनेक वर्षांपासून लढा सुरू आहे. मात्र, सरकार चालढकल करीत असल्याचा आरोप येथील गवकर्यानी केला आहे. आता शासनाने ठोस भूमिका घ्यावी, तत्काळ आरक्षण लागू करावे, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली आहे. गावोगावी जाऊन समाजातील नागरिकांना एकत्र करून आरक्षणाची गरज लक्षात आणून दिली जात आहे.

# लोह्यात खराब रस्ते व धुळीचे लोट; शहर काँग्रेस कमिटीचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

लोहा : शहरातील रस्ते हे मागील काही वर्षांपासून खराब झाल्याने खड्ड्याने त्रस्त झाले असून वाहतूक कोंडी मुळे तसेच धुळीचे लोट निघत असल्यामुळे हवेचं प्रदुषण होत आहे, यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. याकरिता लोहा शहर काँग्रेस कमिटी चे शहराध्यक्ष सोनुभाऊ संगेवार यांनी सर्व टिमला सोबत घेऊन पोलीस निरीक्षक लोहा यांना निवेदन देण्यात आले.
शहरातील खराब रस्त्यांमुळे, अपघात, वाहतूक कोंडी बरोबरच धुळीचे लोट निघत असल्यामुळे शहरातील नागरिक व व्यापारी यांचे आरोग्य झाले असल्यामुळे शहर काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष सोनूभाऊ संगेवार यांनी नुकतेच लोहा पोलीस स्टेशनचे पोलिस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांना निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात असेही नमूद केले आहे की, राष्ट्रीय महामार्ग च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून अहमदपूर रोडपर्यंतचा रस्ता हा सद्या पुर्ण झालेला असून त्यानी चौकात पुढे रस्त्याचे काम चालू असून मोठ्या वाहनांना प्रवेश बंद करून बाय पास चा वापर करावा, असा बोर्ड १५ दिवसांपासून लावला असूनही त्याचा वापर मोठ्या अवजड वाहनांकडून होत नसून मोठी वाहने शहरातूनच जात असल्यामुळे नागरिक व व्यापारी यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकरीता तत्काळ अवजड वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करून सदरील वाहन बाह्यवळण रस्त्याने काढावीत अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष सोनु संगेवार यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

सदरील निवेदनावर शहराध्यक्ष सोनुभाऊ



संगेवार, नपा गटनेते पंचशील कांबळे, पंकज परिहार, शरफोद्दीन शेख, अनिल दाढेल, उत्तम महाबळे, संजय कहाळेकर, श्याम नळगे, शिवराज पवार, भूषण दमकोंडवार, सत्तार शेख, रमजान कुरेशी, बालाजी वाघमारे, अमोल महामुने, श्याम दाढेल, पोर्णिमा महाबळे, संजय पवार, गजानन उत्तरवार, शाहरूख शेख, विनोद पांचाळ, गजानन कळसकर, नबु कुरेशी, शहाबाज शेख, विनोद पांचाळ, अर्जुन महाबळे, देवा पील्लोळे, गणेश दाढेल, चंद्रकांत धोंडगे, विठ्ठल टोणगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बोरवणकरांचा दावा

आधुनिक केसरी

बिल्डर, पोलीस, प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेते यांच्या हितसंबंधांच्या साखळीपासून सामान्य लोकांनी सावध राहण्याची आवश्यकता असल्याचे माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांनी म्हटले. शासकीय जमिनींवर खासगी बिल्डरांचा डोळा असतो. जिथे शासकीय जमिनी खासगी बिल्डरला देण्यात आल्या आहेत. त्याचा पुन्हा आढावा घ्यायला हवा, असे प्रतिपादनही बोरवणकर यांनी केले. माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांनी लिहिलेल्या मॅडम कमिश्नर या पुस्तकात अजित पवार यांच्याबाबत असलेल्या एका प्रकरणावरून चांगलाच राजकीय धुराळा उडाला आहे. या पुस्तकातील दाव्याबाबत स्पष्टीकरण देताना मीरा बोरवणकर यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी म्हटले की, बिल्डर, पोलीस, प्रशासकीय आणि राजकीय नेते यांच्या हितसंबंधांच्या साखळीपासून लोकांनी सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. या पुस्तकातील पुणे पोलिसांच्या जमिनीचे प्रकरण समोर आल्यानंतर अनेकांनी मेसेज द्वारे जमिनीबाबतची प्रकरणे सांगितली. औरंगाबादमध्ये ही 50 एकर जमीन खासगी बिल्डरकडे जात होती. मात्र, जिल्हा प्रशासन , अधिकाऱ्यांनी चिकाटी दाखवली. त्यामुळे हायकोर्ट, सुप्रीम कोर्टापर्यंत लढाई झाली आणि ती जागा पुन्हा सरकारकडे मिळाली. एका प्रकरणात शासकीय जमीन एका खासगी संस्थेला देण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात होता, असेही त्यांनी म्हटले. पोलीस, प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते आणि खासगी बिल्डर यांच्या हितसंबंधांची एक साखळी आहे. यापासून नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन त्यांनी केले. शासकीय जमिनीचा वापर हा शासकीय कार्यालये, गृहनिर्माण आणि इतर सार्वजनिक हितासाठी वापरली जावीत, असेही मीरा बोरवणकर यांनी म्हटले. मीरा बोरवणकर यांनी म्हटले की, पुणे पोलिसांची तीन एकर जमीन हस्तांतरीत झाली असती तर मी चौकशीची मागणी केली असती. अजूनही ही जमीन पोलिसांच्या ताब्यात आहे. त्यामुळे चौकशीची मागणी केली नसल्याचे त्यांनी म्हटले.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# बुद्धं शरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि।

आधुनिक केसरी

**इ.स.पू. तिसऱ्या शतकात ज्या दिवशी सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती, तो दिवस बौद्ध इतिहासात अशोक विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. अशोकाने केलेली ही मोठी धम्मक्रांती होती आणि त्यामुळे आंबेडकरांनी अशोक विजयादशमीच्या दिवशी धर्मांतर सोहळा करण्याचे ठरवले व १४ ऑक्टोबर इ.स.१९५६ रोजी नागपूरमध्ये आपल्या ५ लाख अनुयायांसोबत बौद्ध धम्म स्वीकारला. ती धम्मभूमी सध्या दीक्षाभूमी नावाने ओळखली जाते. आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारून भारतातून लुप्त झालेल्या बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन केले. हा सण विविध ठिकाणी साजरा होत असतो. ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन दीक्षाभूमी नागपूर येथे व्यापक प्रमाणात साजरा केला जातो.**

ज्यात देशभरातून आलेले लक्षावधी बौद्ध अनुयायी सहभागी होतात. तसेच राज्यातील व देशातील विविध राजकीय पुढारी सुद्धा या सोहळ्याला येत असतात. विदेशांतील बौद्ध भिक्खू, उपासक व अन्य राजकीय व्यक्ती सुद्धा उत्सवात सहभागी होतात. दि.२ ऑक्टोबर २००६ रोजी धम्मदीक्षेच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला देश-विदेशांतील १० लाखांपेक्षा अधिक अनुयायांची उपस्थिती होती. धम्मचक्र प्रवर्तन दिन किंवा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा भारतात साजरा केला जाणारा एक प्रमुख लोकप्रिय बौद्ध सण आहे. बौद्ध धर्मीयांद्वारे हा उत्सव दरवर्षी अशोक विजयादशमी आणि १४ ऑक्टोबर रोजी दीक्षाभूमी, नागपूर येथे तसेच स्थानिक बौद्ध स्थळांवर साजरा केला जातो. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागातील लक्षावधी बौद्ध अनुयायी धम्मचक्र प्रवर्तनदिनी नागपूरला येतात. या उत्सवाची पार्श्वभूमी एक बौद्ध धर्मांतरण सोहळा आहे, अशोक विजयादशमीला १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी, नागपूर येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांसोबत नवयान बौद्ध धर्मात प्रवेश केला. भारतभूमीत जवळपास लुप्त झालेल्या बौद्ध धम्माचे चक्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गतिमान करत धम्मचक्र प्रवर्तन- गतिमान केले; तेव्हापासून हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. तथापि, या सणाला धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन असेही म्हणतात. सन १९५७ पासून धम्मचक्र प्रवर्तनाच्या प्रत्येक वर्धापन दिनाला दोन दिवस आधीच बौद्ध अनुयायी दीक्षाभूमीला येत असतात. तथापि, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्याची केंद्रे निर्माण झालेली आहेत. दीक्षाभूमीत आलेले आंबेडकर अनुयायी नागपूर जिल्ह्यात बुद्धिस्ट सर्किटला सुद्धा भेटी देतात, ज्यात कामठीचे ड्रॅगन पॅलेस, बुद्धभूमी, नागलोक, चिचोलीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती साहित्य संग्रहालय आदी विविध ठिकाणे समाविष्ट आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दीक्षाभूमीवर दरवर्षी हजारो लोक धर्मांतर करून बौद्ध भिक्खू बनतात. सन २०१८मध्ये ६२व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी सुमारे ६२ हजार तर सन २०१९ मध्ये ६३व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी ६७ हजार पाचशे सदतीस अनुयायांनी दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्म स्वीकारला होता. दीक्षाभूमी, चंद्रपूर- चंद्रपूर येथील दीक्षाभूमी हे सुद्धा एक ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले ठिकाण



आहे. नागपूर येथे धर्मांतर केलेल्यांनी दि.१६ ऑक्टोबर १९५६ रोजी चंद्रपूर येथेही धर्मांतर सोहळा घडवून आणला, ज्यात सुमारे २ ते ३ लक्ष लोकांनी बौद्ध धम्म स्वीकारला होता. त्यामुळे दरवर्षी येथेही धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, ज्यात देशभरातून आलेले लक्षावधी बौद्ध बांधव सहभागी होतात. औरंगाबाद- औरंगाबाद शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाजवळ असलेल्या औरंगाबाद लेणी परिसरात धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. येथे शहरासह औरंगाबाद जिल्ह्यातील बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने येत असतात. धम्म ध्वजारोहण, अन्नदान, रक्तदान, समुपदेशन, पुस्तक प्रदर्शनी यासारखे विविध उपक्रम राबवले जातात. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बौद्ध लेणी परिसरात विविध कार्यक्रम सुद्धा घेण्यात येतात. सकाळी धम्म ध्वजारोहण कार्यक्रम होतो, त्यानंतर भिक्खुंच्या उपस्थितीत महापरित्राण पाठ आणि दुपारी भोजनदान करण्यात येते. देश-विदेशातील भिक्खू संघ धम्म प्रवचन देतात, २२ प्रतिज्ञांचे पठण घेतात. तसेच इच्छुक उपासकांना बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात येते. शहरातील लोकप्रतिनिधी व अधिकारी अभिवादन कार्यक्रमाला उपस्थिती राहतात. बुद्ध-भीम गीतांचे कार्यक्रम सादर होतात. रक्तदान शिबिर राबवण्यात येतात. दिवसभरात लाखो धम्म उपासक-उपासिकांची अभिवादनासाठी गर्दी होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, नमो बुद्धाय, आणि जय भीमचा जयघोष केला जातो. धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त विद्यापीठ आणि बौद्ध लेणी परिसरात पुस्तकांचे अनेक स्टॉल थाटण्यात येतात. अकोला- सन १९८७पासून अकोला जिल्ह्यात धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा सार्वजनिक पातळीवर सुरू आहे. या सोहळ्याचे नेतृत्व दरवर्षी प्रकाश आंबेडकर हे करत असतात. या दिवशी विशाल मिरवणूक, आखाडे, लेझीम पथके, आकर्षक देखावे, विविध झाक्या, हजारों बौद्धांचा सहभाग, भारतीय बौद्ध महासभेचे शिस्तबद्ध आयोजन, आणि जाहीर सभा असा दरवर्षीचा शिरस्ता असतो. अकोला क्रिकेट क्लब मैदानावर दि.९ ऑक्टोबर २०१९ रोजी ६३वा धम्म मेळावा आयोजित केला गेला होता. नागपूरच्या धम्म सोहळ्याचा कार्यक्रम होऊन अनेक अनुयायी बुलढाणा, वाशीम व मराठवाडा भागात परत जाताना अकोला रेल्वे स्टेशनवर मुक्कामी असत, कारण त्याकाळी फार दळणवळणाची साधने नव्हती. या अनुयायांना राहण्याची सोय होईल, या प्राथमिक उद्देशाने सन १९८६ साली पहिला धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा कार्यक्रम अशोक वाटिकेसमोरील मैदान, पोस्ट ऑफीस मागे संपन्न झाला. नागपूर नंतर संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होणारा हा भव्य दिव्य सोहळा ठरला आहे. वसंत देसाई स्टेडीयमवर अनेक वर्षे हा कार्यक्रम झाला, मात्र आता मागील १० वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून अकोला क्रिकेट क्लब मैदानावर हा सोहळा संपन्न होत आहे.

इ.स.पू. तिसऱ्या शतकात ज्या दिवशी सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती, तो दिवस बौद्ध इतिहासात अशोक विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. अशोकाने केलेली ही मोठी धम्मक्रांती होती आणि त्यामुळे आंबेडकरांनी अशोक विजयादशमीच्या दिवशी धर्मांतर सोहळा करण्याचे ठरवले व १४ ऑक्टोबर इ.स.१९५६ रोजी नागपूरमध्ये आपल्या ५ लाख अनुयायांसोबत बौद्ध धम्म स्वीकारला. ती धम्मभूमी सध्या दीक्षाभूमी नावाने ओळखली जाते. आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारून भारतातून लुप्त झालेल्या बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन केले. हा सण विविध ठिकाणी साजरा होत असतो. ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन दीक्षाभूमी नागपूर येथे व्यापक प्रमाणात साजरा केला जातो, ज्यात देशभरातून आलेले लक्षावधी बौद्ध अनुयायी सहभागी होतात. तसेच राज्यातील व देशातील विविध राजकीय पुढारी सुद्धा या सोहळ्याला येत असतात. विदेशांतील बौद्ध भिक्खू, उपासक व अन्य राजकीय व्यक्ती सुद्धा उत्सवात सहभागी होतात. दि.२ ऑक्टोबर २००६ रोजी धम्मदीक्षेच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला देश-विदेशांतील १० लाखांपेक्षा अधिक अनुयायांची उपस्थिती होती, हे उल्लेखनीयच!



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# काजवा सूर्यापेक्षा जास्त महत्त्वाचा

आधुनिक केसरी

**मदत सहकार्य हे वेळेच्या गणिता नुसार महत्वपूर्ण ठरत असतं . मदत किती मोठी अथवा छोटी आहे हे महत्वाचं नसुन मदतीची वेळ महत्वाची असते.तहान लागल्यावर पाण्याचा एक थेंब देखिल जीवनदायी असतो .वेळ निघून गेल्यावर मिळालेला समुद्र देखिल कामाचा नसतो . योग्य वेळी झालेली छोटीसी मदत देखिल जीवन हितार्थ ठरते . जीवनात जेव्हा फक्त अंधकार असतो तेव्हा मार्ग दाखवणारा काजवा देखिल सुर्या पेक्षा तेजस्वी आणि प्रभावी असतो. आपल्या जीवनात जेव्हा फक्त गर्द अंधकार असतो. सगळं काही संपल्या सारख वाटत असतं. आता जीवनात काही अर्थ शिल्लक नाही अशी भावना जेव्हा निर्माण होते आणि आपसुकच आपण पुर्ण खचुन जातो.**

शरीरात फार उत्साह उरत नाही .अशा वेळी दिसणारा आशेचा एखाद्या किरण देखिल आपल्यासाठी जीवन बदलणारा असतो .मग सदैव प्रकाश देणारा सुर्य हा आपल्यासाठी उपयोगी आहेच पण आपलं सगळ काही संपुष्टात आलं तेव्हा दिसलेला आशेचा एक किरण आपलं आयुष्य बदलणारा ठरल्याने आपल्यासाठी तो किरण महत्वाचा आहे उपयोगी आहे.जीवनात आनंद असल्यानंतर अख्खं जग आपल्या सोबतीला असतं .हे त्रिकाल सत्य आहे. पण आपण जेव्हा दुःखात अडचणीत , तणावात असतो तेव्हा मात्र फार कोणिही आपलं नसत मग नेमकं अशा वेळी ज्यांनी आपल्याला छोटं मोठं सहकार्य केले. आपल्या वाईट वेळेत थोडं बहुत आशेचा किरण दाखवला तेच आपल्यासाठी सगळ्यात महत्वाचे असतात.मग ते सहकार्य अगदी छोटं असल तरी देखील हरकत नाही पण ते योग्य वेळी झालेल सहकार्य असतं. अवेळी प्रचंड असं सहकार्य झालं तरी ते फार उपयोगी नसतं .आवश्यकता आहे ती त्यावेळी मिळालेलं छोटं सहकार्य जीवण तारून नेत असत .म्हणून सहकार्य मदत हि कधी झाली कोणत्या वेळेला झाली याला खूप महत्व आहे.आपल्या जीवनातील एखाद्या च महत्व हे त्याच्या मोठेपणावर ठरत नाही. आपल्या कठिण काळी कोण उपयोगी पडलं मग ते छोटं मोठं कसं हि असो महत्व त्यालाच असतं .प्रचंड तहान लागली पाण्यावाचुन जीव कासावीस होत आहे. त्यावेळी पाण्याचं महत्त्व आहे. तहान लागली नसताना आपल्या जवळ असणारा समुद्र निरुपयोगी असतो .आपण एक घोट पाण्यासाठी कासावीस होतो .तेव्हा मात्र समुद्र आपल्या काही कामाचा आहे का ? तर आपल्या साठी जिथल पाणी उपलब्ध असेल तिथलं एक घोट पाणी महत्वाचं असतं. जे आपली ताहण भागवेल.महणुन सुर्य प्रचंड प्रकाशमान आहे . त्याबद्दल शंका नाही.पण आपण अंधारात प्रवास करताना रात्री चमकणारा छोटासा काजवा आपल्यासाठी दिशादर्शक मार्गदर्शक असतो . कारण तो उजेडात नाही तर अंधारात आपली साथ देण्यासाठी योगदान देत असतो .म्हणून उजेडातील सुर्य पेक्षा अंधारात आपली साथ देणारा काजवा आपल्यासाठी हितकारक उपयोगी असतो.प्रत्येक बाबीच महत्व हे त्या बाबींच्या उपलब्धतेनुसार नाही तर वेळेनुसार ठरत असतं .मिष्ठान्न उपलब्ध आहे पण भुक नाही . आणि जेव्हा भुक लागली तेव्हा चटणी भाकरी उपलब्ध आहे.मग आपल्यासाठी उपयोगी काय मिष्ठान्न कि चटणी भाकरी तर वेळेवर उपलब्ध झालेली चटणी भाकरी आपल्यासाठी महत्वाची आहे.महणुन वेळेला खुप महत्व आहे. आपल्या वेळेला काय आवश्यक आहे . आणि काय उपलब्ध आहे याला ते आपल्यासाठी महत्वाच .अवेळी उपलब्ध काय या पेक्षा योग्य वेळी काय कामी पडलं ते जीवनात आति महत्वाचं असतं. प्रत्येक गोष्टीचं महत्व वेगवेगळे आहे .पण आपण संकटात असताना आपल्या उपयोगी जे पडलं ते आपल्या साठी जास्त महत्वपूर्ण असतं. सुर्य हा सृष्टी वरील सगळ्यात जास्त प्रकाश देणारा आहे पण आपण रात्री अंधारात प्रवास करतोय मग आपल्या साठी अंधारात थोडा नगण्य प्रकाश दाता आशेचा किरण दाखवणारा काजवा महत्वाचा असतो. कारण अंधाराशी लढताना तो आपल्याला शक्ति बळ उमेद देतो. सकाळ होईपर्यंत आपल्या मध्ये उर्जा टिकवून ठेवतो. म्हणून आपल्या साठी उजेडातील सुर्या पेक्षा अंधरातील काजवा खूप महत्वाचा आहे.कारण सगळ्या दिशा सगळ्या वाटा बंद असताना आपल्याला काजवा अंधारात दिशा मार्ग दाखवतो. म्हणून आपल्यासाठी काजवा हा सुर्या पेक्षा नक्कीच श्रेष्ठ आहे. म्हणून परस्थिती नुसार महत्व ठरत असतं जीवनातील काळ आणि वेळ याला खूप महत्त्व असतं. पेशंट जेव्हा खुप नाजुक स्थिती मध्ये असतो तेव्हा डॉक्टर त्याच्यासाठी देवा पेक्षा कमी नसतो . एखाद्या व्यक्तीच्या जवळ कोट्यवधी रुपये आहेत परंतु नेमक त्याला गरज असेल तेव्हा त्याच्याकडं जवळ किती पैसे आहेत याला महत्त्व असतं. सुर्य हा खुपच प्रकाशमान आहे.परंतु आपण काळाकुट्ट अशा अंधारात घनदाट जंगलातून प्रवास करत असताना जो काजवा दिसेल आणि त्याचा छोटा पण आपल्यासाठी योग्य वेळी लाभलेला प्रकाश हा आपल्याला सुर्याच्या प्रकाशा पेक्षा जास्त महत्वाचा असतो . एकंदरीत काय तर आपण जेव्हा संकटात असतो. अडचणीत असतो तेव्हा आपल्याला जे सहकार्य होईल मग ते छोटं असो वा मोठं असो तेच आपल्या कामाचं असतं आणि नंतर काहीही मिळाल उपलब्ध झालं तर ते आपल्या साठी फार महत्वपूर्ण नसतं .जे संकटं काळी कमी पडलं तेच महत्वाचं. म्हणून सहकार्य मदत छोटी कि मोठी याला महत्व नाही योग्य वेळी कामी काय पडल याला महत्व असत. अंधारातील काजवा हा उजेडातील सुर्या पेक्षा महत्वाचा असतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# उपजिल्हा रुग्णालयाची इमारत बांधली खरी; पण सुविधांचा विसर

## जिल्हा रुग्णालयाला सर्व सुविधा द्यावी; जनतेची ओरड

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्याला सर्व सामान्यांना आरोग्य सुविधा पुरवायचा म्हणून मोठा गाजावाजा करत शासणाने मोठा गाजावाजा करत उपजिल्हा रुग्णालयाची इमारत बांधली खरी परंतु शासणाला लागणाऱ्या सुविधाचाच विसर पडला आहे. सद्या उपजिल्हा रुग्णालयात श्री कथा म्हणजे "चणे आहेत पण दात दात नाही" या म्हणी प्रमाणे डॉक्टर आहेत पण लागणाऱ्या सुविधा नाहीत अशी अवस्था आहे. राज्य शासणाच्या हलगर्जीपणामुळे लोहा येथील उप जिल्हा रुग्णालयात ना मनुष्यबळ, परिचारिका, ना वार्डबॉय ना पाण्याची व्यवस्था, ३०० पेक्षा ज्यास ओपीडी असलेले रुग्नालयात चालते वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जिवावर अशी अवस्था असल्याने शासनाने लोहा उपजिल्हा रुग्णालयाला सर्व सोई सुविधा पुरवून सर्व सामान्यांचे आरोग्य जपावे, अशी मागणी जनतेतून होत आहे. राज्य शासनाने मोठा गाजावाजा करत लोहा येथे उपजिल्हा रुग्णालयाच्या भव्य इमारतीची उभारणी केली खरी परंतु शासणाच्या वतीने सोई सुविधा व मनुष्यबळ पुरवण्याचा विसर पडला आहे असेही ओरड सर्व सामान्य नागरीकातुन बोलले जात आहे. मागिल काळात पाण्या अभावी रुग्नालयाची काम ठप्प झाले असता व जिल्हात डेंग्यूचे थैमान असतानाही लोहा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अपुरे मनुष्यबष असतानाही वाखाणण्याजोगे काम केल्याने जनतेतुन समाधान व्यक्त होत आहे लोहा-कधारचे माजी आ. रोहिदास चव्हाण यांनी दररोज मोफत पाण्याचे टॅकर दिल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वतीने रुग्नालयात कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेसह इतर शस्त्रक्रिया केल्याने अनेकांचं समाधान व्यक्त केले जात आहे उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी असताना व ओपीडी ३०० पेक्षा ही ज्यास्त रुग्नालयात शासणाच्या वतीने चुकीच्या पध्दतीने खोळंबलेल्या सोई-सुविधा व मनुष्यबळ, रुग्नालयात जाण्यासाठी, रस्ता पाणी अशा सुविधा पुरविल्या अशी ओरड जनतेतुन होत आहे.

**राज्य शासनाने सर्व सोई सुविधा पुरवा :** राज्य शासणाने मोठा गाजावाजा करत नांदेडसह राज्यातील रुग्नालयात सर्व सोई सुविधा पुरवणार अशी घोषणा केल्या नंतर ही पंधरा दिवसा नंतर ही शासणाच्या वतीने मनुष्यबळास कोणत्या सोई पुरवण्यात अपयशी ठरणाऱ्या, सर्व सामान्य माणसांना हक्काच्या मुलभुत गरजा अपयशी ठरणाऱ्या राज्य शासणास सत्तेवर राहाण्याचा अधिकार नाही . सर्व बाबींवर अपयशी ठरणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी व आरोग्य मंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी लोहा कंधारचे मा .आ .रोहीदास चव्हाण यांनी केली आहे .

# जारीकोट, सायखेडा परिसरात सर्रास दारु, गुटखा, शिंदी, विक्री

## अवैध दारु, गुटखा विक्रेत्यांची दिवाळी, सामान्यांचे दिवाळे!

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील जारीकोट व सायखेडा परिसरात सर्व नियम धाब्यावर बसवून खुलेआम अवैध देशी - विदेशी दारु, शिंदी, गुटखा विक्री तेजीत असल्यामूळे दारु विक्रेत्यांची रोज दिवाळी होत असली तरी सामान्य कुटुंब प्रमुख दारुच्या नशेत बुडाल्यामूळे त्यांच्या कुटुंबाचे मात्र दिवाळे निघत आहे.

जारीकोटमध्ये दोन ठीकाणी देशी - विदेशी दारु तर शिंदी खुलेआमपणे विक्री केली जात आहे.तसेच परवानाधारक दारु विक्रेता अवैधपणे जारीकोट शेजारील गावामध्ये दारुचे बॉक्स पुरवठा करत असल्याचीही माहीती प्राप्त झाली आहे. सायखेडा येथे चार ठीकाणी देशी



- विदेशी दारु विक्री होत आहे.राज्यात गुटखा बंदी असताना ही सायखेडात मात्र सहजपणे गुटखा तरुणांना मिळत आहे. एक वेळेस पोलिसांनी धाड टाकून गुटखा विक्रेत्यावर गुन्हा नोंदविला होता. मात्र यामूळे त्यांच्यावर काही परिणाम झाल्याचे दिसत नाही.

अवैधपणे दारु,शिंदी आणि गुटखा विक्रेते माया जमवित असले तरी या व्यसनामूळे अनेक लोकांच्या कुटुंबाची राख - रांगोळी होत आहे.

पहाटे - सकाळपासूनच तरुण दारुसाठी हपापले दिसत आहेत.त्यांमूळे शारीरिक, आर्थिक, मानसिक, कौटुंबिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे.

या अवैध दारु विक्रीला कोणाचा आशिर्वाद आहे? हा प्रश्न उपस्थितीत होत आहे. पोलिस प्रशासनाने यात बघ्याची भूमिका न घेता यांच्या मुसक्या वेळीच आवळावयात अशी मागणी सामान्य लोकांमधून होत आहे.

शहारा सह ग्रामीण भागात देशी दारू, शिंदी, मटका, 52पती कलब व अन्य वेसनीला ग्रामीण सह तालुक्यातील युवा पीडीच भविष्य उद्धवस होत आहे . याला जबाबदार कोण? याला आळा कोण घालणार? संबंधितावर तत्काळ कारवाई करावे अन्यथा शिवसेनेच्या आंदोलन करण्यात येईल याची दखल प्रशासन घ्यावी .
**गणेश गिरी महाराज**
**शिवसेना उद्धव ठाकरे ( गट )**
**उपजिल्हाप्रमुख**

# फेजचे गट्टू जळून आठ दिवस उलटले; तरीही गाव अंधारात

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथील सिंगल फेज लाईनचेचे डीपीचे गट्टू जळून आठ दिवस उलटले असून आठ दिवसापासून गाव अंधारात असल्याने ग्रामस्थांचा महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उदासीन धोरणामुळे वडोद बाजार येथील अर्ध्या गावावर अंधारात राहण्याची वेळ आली आहे. महावितरण विभागाने वडोद बाजार येथे सिंगल फेज लाईनचे गट्टू उपलब्ध करून गावातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे बाजार येथे स्मशानभूमी येथे असलेल्या डीपीवरील सिंगल फेजचे गट्टू जळाले असून त्यामुळे वडोद बाजार येथील काही भागातील नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे. सिंगल फेज लाईनच्या काळात विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असतो. त्यामुळे ग्रामस्थांना होणाऱ्या




विद्युत खंडीत पुरवठ्यामुळे रात्रीच्या वेळी अंधाराचा सामना करावा लागतो महावितरण विभागाने सिंगल फेज गट उपलब्ध करून गावातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे. वडोद बाजार येथील महावितरणचे कर्मचारी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत असतात मात्र ओव्हरलोड असल्याने विद्युत पुरवठा वारंवार खंडित होतो या ठिकाणी मोठ्या कॅपिसिटीचे गट्टू बसविण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. येथील स्मशानभूमी जवळील डीपी जळाली असून डी पी लवकर मिळवून देण्यात यावी आम्हाला अंधारात राहण्याची वेळ आली आहे मच्छर डासांचा प्रभाव वाढला आहे त्यामुळे ग्रामस्थ आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे.

वडोद बाजार येथे विद्युत पुरवठा खंडित होत असल्यामुळे आम्हाला अंधारात राहण्याची वेळ आली आहे महावितरण विभागाने वारंवार होणारा विद्युत पुरवठा सुरळीत करून ग्रामस्थांचा प्रश्न सोडवावा . **रईस शेख .**

महाराष्ट्र Business Katta









# ध्येय उराशी बाळगून स्थितप्रज्ञपणे सकारात्मक वाटचाल



प्रमोद आठवले
संपर्क क्र. 9420941213

आधुनिक केसरी

**वर्तमानकाळात प्रयत्नवादी असणारी माणसे आपल्या कर्माने भविष्यकाळ उज्ज्वल बनवितात, अशा माणसांना जीवनात अनेक वेळा संकटांना तोंड द्यावे लागते आणि त्यांच्या जीवनात आलेली ही संकटे त्यांना विचलित करण्यासाठी आलेली नसतात तर त्यांनी संकटांना हिंमतीने तोंड कसे द्यायचे हे शिकवण्यासाठी आलेली असतात. त्यातूनच अशी स्थितप्रज्ञ माणसे घडतात आणि तीच आदर्शाचा महामेरू ठरतात. आपण जीवनात अनेक व्यक्ती पाहतो की, त्या प्रचंड इच्छाशक्तीने स्वबळावर स्वतःसाठी काहीतरी वेगळे करण्याच्या हेतूने मार्ग आखत असतात आणि हे मार्ग बनवत असताना त्यांना अनेक अडचणी येतात.**

पण या अडचणींनाच आव्हान समजून अगदी आनंदाने स्वीकारतात, जणू काही त्या अडचणी त्यांना अधिक प्रबळ बनविण्यासाठी आणि त्यांना मार्गक्रमण करताना संयमाने पुढे चालत राहावे, यासाठी दिशादर्शक ते मानतात. अडचणी आणि प्रबळ इच्छा या दोघांना ती व्यक्ती बुद्धीच्या जोरावर समांतर करत असते आणि ही समांतरता ज्याला जमते तीच व्यक्ती जीवनात यशस्वी होते. अशी समांतरता आपल्या उच्च कोटीच्या बुद्धिमत्तेतून पेलवणारे भुसावळ येथील रहिवासी तथा बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश लक्ष्मण पाटील सर यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. नुकताच त्यांना आपल्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने मुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या हस्ते मुंबई येथे आयोजित समारंभात गौरविण्यात आले.

कौटुंबिक, सामाजिक, नैतिक गुणांचा परिपाक असलेले आदर्श व्यक्तिमत्त्व डॉ. जगदीश पाटील यांनी वयाच्या तिशीतच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून मराठी विषयात संत एकनाथांची अभंगगाथा : भक्ती विचार या विषयावर पीएच.डी. पदवी संपादन केली. तसेच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे तथा बालभारती येथे मराठी भाषा अभ्यास मंडळ सदस्य म्हणून त्यांनी काम केले असून आठवी, दहावी व बारावीच्या सात पाठ्यपुस्तक निर्मितीत अभ्यास गट सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सर्व शाळांचे मूल्यमापन करण्यासाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन आराखडा SQAAF निर्मितीमध्ये ते राज्यस्तरावर कार्य करत आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी शिकायचे कसे यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण म्हणून अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षण कार्यक्रमात राज्यस्तरीय सुलभक म्हणून कार्य करत आहे. कष्ट कार्य करून राष्ट्रहितासाठी जीवन जगणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला विविध सामाजिक संस्था, जिल्हास्तर तसेच राज्यस्तरावर विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे. त्यामुळे पुरस्कारास पात्र महाविद्यालयात डॉ. जगदीश पाटील सर गुणगौरव समिती भुसावळ यांच्यातर्फे भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करून त्यांना सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. आजपर्यंत सातत्याने करत



करण्याची जिद्द आणि आपल्या कामाप्रती विश्वास असेल तर नक्कीच जीवनात यश मिळते आणि हेच यश त्यांना प्रत्येक पावलोपावली मिळत गेले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विद्वत्त्वं च नृपत्वम च नैव तुल्य कदाचन स्वदेशे पूज्यते राजा विद्वान सर्वत्र पूज्यते राजा आणि विद्वान यांच्यामध्ये राजाला फक्त आपल्या राज्यात आदर मिळतो पण विद्वान हा सर्वत्र आदरास पात्र ठरतो आणि असे मौलिक असे ते अनोख कार्यप्रवण व्यक्तिमत्व आहे.

शिक्षणक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा सन्मान म्हणून महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२२-२३ हा पुरस्कार मुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथे समारंभात प्रदान करण्यात आला. त्यानंतर हा पुरस्कार मिळाल्याबद्दल भुसावळ येथील नाहाटा आलेल्या सामाजिक, शैक्षणिक योगदानाचे वास्तव रूप म्हणजे त्यांना देण्यात आलेले हे अनेकविध पुरस्कार होय. उच्च कोटीची सामाजिकता असलेली व्यक्ती आपल्या अंगी असलेले गुण आणि ज्ञान यांचा संगम करून समाजात सुविचारांचे बीज रोवत असतात. अशा व्यक्तींबद्दल म्हणायचे झाले तर,

समाजातील विविध स्तरावर, अमौलिक करतात गुंतवणूक,
नव्या विचारधारा नवे प्रवाह,
नव्या संकल्पांची रुजवणूक.

आणि हीच रुजवणूक त्यांच्या बहरलेल्या कार्यातून आपण पाहत असतो. असे कार्य करीत असताना कुणी अशा कार्याची प्रशंसा करो किंवा न करो ही उत्तमाचा वेध घेणारी पाऊले सतत प्रयत्नशील असतात हेच खरे.

ध्येयासाठी अतोनात प्रयत्न करणं,
हे त्यांच्याकडून शिकावं,
काय मिळवलं याहून किती मिळवलं,
याचं मोजमाप अधिक असावं.

सागरातील लाट प्रवाही असते. कधी हलकेच प्रवाहात झेप घेते तर कधी गटांगळ्या खात रौद्ररूप धारण करते आणि अशाच लाटांचा प्रत्यय जीवनात येतो आणि तो येणे गरजेचे आहे. कारण आपण किती सकारात्मक पाऊल टाकतो, हे त्यावरून ठरत असते. अशीच ध्येय उराशी बाळगून अनेक लाटांसोबत मजल दरमजल करत सकारात्मक वाटचाल करणाऱ्या डॉ. जगदीश पाटील सर यांना वाढदिवसाचे अभीष्टचिंतन आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा. परमपिता परमेश्वर आपल्या ज्ञानरूपी तेजाचे किरण आपल्यावर सदा प्रकाशित करत राहो व ईश्वरी प्राप्त आपल्या ज्ञानाने इतर शैक्षणिक समाज प्रज्वलित होत राहो. आपल्या जीवनातला प्रत्येक क्षण हा परमशांतीने, चिरकाल टिकणाऱ्या आनंदाने आणि दैवीशक्ती प्राप्त उत्तम आरोग्याने सदैव भरलेला राहो. आपली प्रत्येक मनोकामना परमपिता परमेश्वर यथावकाश पूर्ण करो व आपली उत्तरोत्तर प्रगती होत राहो. आपली किर्ती दशदिशांपर्यंत पोहोचो. आपले बौद्धिक स्वामित्व चिरकाल प्रस्थापित राहो, हीच ह्या वाढदिवसाच्या निमित्ताने परमपित्या परमेश्वराला प्रार्थना.

# प्रतिकूलतेच्या अंधारातील प्रामाणिक दिव्यज्योत



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मराठी साहित्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच विशेषत: १९६० नंतर जे ठळक वाङ्मयप्रवाह उदयास आले, त्यापैकी ग्रामीण साहित्याचा प्रवाह लक्षणीय असा आहे. त्यातील ग्रामीण साहित्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील राहणीमान, तेथील समस्या, जनजीवन, संस्कृती, बोलीभाषा, रूढी- परंपरा यांची ओळख होऊ लागली. ग्रामीण जीवन हे ग्रामीण व्यवसाय आणि ग्रामसंस्था यांच्या चौकटीनी अधिक नियत असते. त्यामुळे या जीवनात प्राकृतिक वृत्ती- प्रवृत्ती व त्यांच्याशी निगडित अशा भावभावना यापेक्षा समाजमान्य चौकटीतील भावजीवन अधिक दृगोचर होते. ग्रामीण भागात सध्याच्या काळात बऱ्याच सोयी उपलब्ध असल्या तरी पूर्वी बरीच असुविधा होती.**

त्यामुळे शहरी जीवनापेक्षा खेड़यापाड्यात आयुष्य व्यतीत करणं तितकेच आव्हानात्मक होते. पण अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपले ध्येय साध्य करणाऱ्या व्यक्तीकडे पाहिले की आपल्यालाही प्रेरणा मिळते.

कादंबरी म्हटले की, कल्पकतेने सजलेले कथानक, एखादी रहस्यमय, गूढ गोष्ट असे विषय निवडले जातात.पण काही कादंबऱ्या अशा असतात, ज्या वाचकाला खड़बडून जाग आणतात. जीवन जगताना छोट्या - छोट्या गोष्टीसाठी करावा लागणारा संघर्ष जगण्याची खरी प्रेरणा असते. समाजातील प्रवाहात समांतर राहण्यासाठी स्वतःचं अस्तित्वाची दखल घेण्यास प्रवृत्त करावे लागते.अशाच एका ध्येयवेड्या माणसाच्या संघर्षाची प्रेरणादायी कहाणी कादंबरीच्या रुपात अवतीर्ण झाली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजनगावी राहणारे लेखक डॉ. नाना भोंग हे पशुधन विकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.त्यांची 'साँच ' नावाची कादंबरी नुकतीच वाचनात आली आणि जाणवले की, या कादंबरीचे परिणामस्वरूप पाहता मनाला उभारी देणारी ही संघर्षमय गाथा आहे. एकूण ५६६पानांची ही महाकादंबरी दीर्घ स्वरुपात असली तरी त्याचे साहित्यमूल्य व्यापक आहे. 'साँच' कादंबरीच्या शीर्षकापासूनच मनात उत्सुकता निर्माण होते. हे 'साँच' म्हणजे काय, त्याचा अर्थ काय ? तर रसिकहो, संपूर्ण कादंबरीचे सार या दोन शब्दात सामावलेले आहे. कादंबरी वाचून झाल्यानंतर उमगते की, लेखकाने या शीर्षकाची निवड का केली असावी.

'साँच' ही आत्मकथनात्मक कादंबरी असून त्यात लेखकाचे भावविश्व, जगण्यासाठी केलेली धडपड , संघर्ष तसेच अंतर्मनातील संवेदना मांडताना एक प्रकारे लेखकाने सिंहावलोकन केले आहे. ही कादंबरी लेखक स्वतः कथन करत आहे, प्रथमपुरुषी निवेदन, ग्रामीण बोलीभाषेचा बाज, विशिष्ट ग्रामीण शब्दयोजना, उत्तम संवादरचना त्यामुळे कादंबरीतील भाव नेमकेपणाने वाचकांपर्यंत पोहचतो.

आत्मकथन त्या लेखकाचे जरी असले तरी ते फक्त त्याचेच राहत नाही. त्याच्या कक्षा अधिक रूंदावतात. मनातील भाव, विचार जेव्हा लेखणीतून कागदावर उमटतात तेव्हा त्या लेखकाच्या विचारांना प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त होते. वाचक पुस्तकातील त्या पात्राच्या जागी स्वतःला ठेवून पाहतो. अशी लेखनशैली डॉ. नाना भोंग यांची आहे.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती पण शिक्षणाची जिद्द मनात होती. शिक्षण असे शस्त्र आहे जे आपल्याला या परिस्थितीतून वर आणू शकते, हे लेखकाने वेळीच जाणले आणि त्यांचा परिस्थितीशी झगड़ण्याचा प्रवास सुरु झाला. त्या वेळी मनाची जी अवस्था होती, ती शब्दातून अगदी प्रामाणिकपणे व्यक्त केली आहे.

कादंबरीतील प्रसंग वाचताना लेखकाच्या कुटुंबाने त्यांच्या शिक्षणासाठी केलेली मेहनत, काबाडकष्ट याचे केलेले चित्रण मनाला विषण्ण करणारे आहे. लेखकाने मनोगतात प्रत्येक व्यक्तिने केलेल्या कष्टाप्रति कृतज्ञता  व्यक्त केली आहे. गंगू आणि आका यांनी केलेली मेहनत, लेखकाच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून या दोघिनी केलेली तडजोड, सोसलेली हालअपेष्टा, कामासाठी२७ वेळा बि-हाड हलवणारी आणि परिस्थितीविषयी कोणतीही तक्रार न करता वास्तवाला स्वीकारुन जीवन जगणाऱ्या गंगू आणि आका यांच्या विचारांमध्ये सकारात्मकतेची बीजे किती खोलवर रुजली आहेत, याची जाणीव होते. या दोघीनी केलल्या त्यागाची लेखकाला जाणीव आहे. त्यांनी केलेल्या कष्टाचे लेखक कसे चीज करतात, यासाठी ही कादंबरी वाचायला हवी.


प्रत्येक आई- वडील आपल्या मुलांच्या हितासाठी असेच कष्ट उपसत असतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांना अभिमानाचे क्षण प्रदान करणं , की प्रत्येक मुला- मुलींची जबाबदारी आहे, ही गोष्ट या कादंबरीत मला प्रकर्षाने जाणवली. इच्छित ध्येय प्राप्त करण्यासाठी, यशप्राप्तीसाठी किती त्याग करावा लागतो, याची प्रचिती देणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीत फक्त लेखकाचा संघर्षप्रवास नाही, तर गावातील सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक परिस्थितीची माहितीसुद्धा दिलेली आहे. गावचा कारभार, गावात असणाऱ्या आणि नसणाऱ्या सुविधा, तसेच बालपणातील गमतीजमती, वेगवेगळया स्वभावाची व्यक्तिमत्त्व अशा विविध सामाजिक घटकांचा समावेश यात केलेला आहे. अर्थातच , साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. समाजातुनच असे विविध विषय अनुभवाच्या रुपात लेखकाला प्राप्त होत असतात आणि तेच अनुभव पारदर्शकपणे शब्दात प्रतिबिंबित होतात.

कोणत्याही आत्मचरित्रात किंवा आत्मकथनात नुसतेच लेखकाचे गतायुष्य नसते तर त्या अनुषंगाने तो तो काळ आणि त्या त्या काळातील परिस्थिती, वातावरण, प्रदेश, समाजजीवन, भाषा, संस्कृती, चालीरीती, प्रथा, वेशभूषा इत्यादीचे चित्रण येत असते. तसे या कादंबरीतसुद्धा आले आहे.

मराठी साहित्यातील मैलाचा दगड ठरलेल्या साहित्यकृती वाचून लेखक प्रभावित झाले आणि 'साँच' कादंबरीचा जन्म झाला. वाचनाने माणूस समृद्ध होतो, हे खरेच आहे.

कादंबरीचे शीर्षक जसे उत्कंठावर्धक आहे, तसेच मुखपृष्ठही बोलके आहे. अशोक सुतार यांनी समर्पक मुखपृष्ठ रेखाटले आहे. समाजातील अशा प्रेरणादायी व्यक्तींचा संघर्ष प्रकाशात येणं गरजेचे आहे, अशा पुस्तकाद्वारे ग्लानी आलेल्या मनाला आत्मबकळ मिळेल, जीवनातील वादळात पाय घट्ट रोवून उभे राहण्याची ऊर्जा मिळेल !

( साँच - आत्मकथनात्मक कादंबरी / लेखक : डॉ. नाना भोंग / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : ४९० रुपये )



# जीवनाचे सम्यक तत्त्वज्ञान मांडणाऱ्या साहित्यरत्नांप्रती शासनाची उदासीनता

## आठ खंड छपाई होऊन पूर्ण तरी प्रकाशनास टाळाटाळ का?

आधुनिक केसरी

**लोकशाहीर आणि प्रतिभावंत साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी 1940 ते 1970 या तीन दशकाच्या कालावधीत येथील तळागळातील माणसांच्या जगण्याला हात घालून त्यांच्या वास्तव जगाचे दर्शन मराठी साहित्याला करून दिले. मराठी साहित्याची नाळच त्यांनी आपल्या लेखणीतून सामाजिक जाणिवांशी जोडून दिली. त्यामुळेच त्यांचे साहित्य आजही अजरामर आहे. महाराष्ट्र शासनाच्या अण्णाभाऊ साठे चरित्र साधने समितीच्या सदस्यांनी अण्णा भाऊंच्या साहित्याचे आठ खंडाचे काम प्रचंड मेहनत घेऊन वेळेत पूर्ण केले आणि ते खंड छापून देखील तयार केले. याचे 1 ऑगस्ट 2023 रोजी प्रकाशन होणार होते परंतु शासनाच्या उदासीन धोरणामुळे या प्रकाशनाला मुहुर्त मिळेनासा झाला आहे. त्यामुळे या आठही खंडाच्या नव्या कोऱ्या हजारो प्रती जशास तशा धूळखात पडून आहेत., हे वाचकांना अस्वस्थ करणारे ठरले आहे. याप्रकरणी समिती सदस्यांनी शासनाला लवकरात लवकर प्रकाशन करून ते वाचकांना उपलब्ध करून देण्याच्या वारंवार केलेल्या विनंतीला खो दिला आहे. त्यामुळेच संवेदनशील वाचक आणि साहित्यिकांनी आधुनिक केसरी जनचर्चेत शासनाच्या उदासीन धोरणावर संताप व्यक्त करीत प्रकाशनास टाळाटाळ का? असा सवाल उपस्थित केला.**



**महाराष्ट्र शासनाने जातीय मानसिकतेतून बाहेर पडावे :** महाराष्ट्र शासनाच्या' अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती 'च्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्याचे आठ खंड धुळ खात शासन दरबारी पडून असल्याची ऐकले. हे ऐकूनच शासन जातीय मानसिकतेतून हे सर्व करत असल्याचे लक्षात येते. नाहीतरी अण्णा भाऊ साठे हे साहित्य क्षेत्रातील फार मोठे साहित्यिक असूनही इथल्या जातीय व्यवस्थेने त्यांना दुर्लक्षितच ठेवले आहे. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्रांती निर्माण करते, विषमतेवर,अन्याय अत्याचारावर प्रहार करते, समाजमन घडवून मानवता निर्माण करण्याचा प्रयत्न करते त्या साहित्याला जातीय मानसिकतेतून दूर केले जाते व पाना फुलांच्या साहित्याला पुढे आणले जाते. हे जाणून बुजून केलेले षडयंत्र असते. हजारो वर्षे समाजाचे मन एकाच ठिकाणी थांबून ठेवण्याचे सामर्थ्य साहित्यात असते.उदा. पोथ्या, चमत्कार, जादूटोणा, फलप्राप्ती असे साहित्य इथल्या शासनाला व जातीय मानसिकतेतील लोकांना आवडते पण अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे क्रांती करणारे, मानवता निर्माण करणारे आहे. त्यामुळे शासनाने जातीय मानसिकतेत अडकून न राहता किंवा संकुचित मनोवृत्ती न बाळगता अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे आठही खंड लवकरात लवकर वाचकांना उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. **- प्रा. डॉ. सतीश मस्के, साहित्यिक पिंपळनेर (धुळे)**

**आठही खंडाचे शानदार सोहळ्यात प्रकाशन लवकर करावे :** महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीने कादंबरीचे सहा खंड आणि कथासंग्रहाचे दोन खंड अशा आठ खंडाचे काम समितीच्या सदस्यांनी अत्यंत निष्ठापूर्वक पूर्ण केले असून ते छापून तयार आहे.परंतू समितीचा सततचा पाठपुरावा कमी पडल्यामुळे त्याचे प्रकाशन झाले नाही.केवळ पत्र देऊन किंवा चार-दोन वेळा भेटल्याने प्रकाशन होईल असे वाटत नाही.परंतु शासनाने आठही खंडाचे प्रकाशन शानदार सोहळ्यात करावे अशी समाजाच्या वतीने शासनाकडे मागणी आहे. **शिवा कांबळे,नांदेड, (सदस्य साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन)**

संकलन
बाळासाहेब जोगदंड

मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर




**छापायचे मात्र वितरण करायचे नाही...? :** विख्यात कथा, कादंबरीकार अण्णाभाऊ साठे यांच्या समग्र साहित्याचे आठ खंड छापून तयार आहेत मात्र प्रकाशन समारंभाअभावी या सर्व साहित्याचे खंड सरकारी गोदामात पडून आहेत. हे ऐकून अत्यंत वाईट वाटले. सरकारने त्वरित प्रकाशन समारंभ घेऊन हे आठ खंडातील साहित्य वाचकांना उपलब्ध करून द्यावे. छापायचे मात्र त्याचे वितरण वेळेवर व व्यवस्थित करायचे नाही हा सरकारी कारभार बरोबर नाही.
**-डी. के. शेख, साहित्यिक, उस्मानाबाद**

**खोडा घातला जातो ही लाजीरवाणी बाब :** अण्णा भाऊंची विचारशैली तात्विक समाजनिष्ठांची व समतावादी विचारांची वीण पकडून सामाजिक जाणिवेचा अखंड पोत निर्माण करते. सामान्य माणसांच्या जीवनाचे तळ शोधत आपली वेगळी वाट निर्माण करतात. मात्र या कलाकृती नवजीवनाचे नवचैतन्य व जग बदलण्याची उर्मी साहित्यातून अविष्कारित करतात. त्यामुळेच सामाजिक समाजचिंतनाचा आरसा त्यांच्या साहित्यातून सत्याची कास धरीत जगासमोर तळपळत राहते. परंतु व्यवस्थेला हे पचत नाही. आणि त्यामुळेच खंड प्रसिद्धी किंवा खंड प्रकाशन असो यात या ना त्याप्रकारे खोडा घातला जातो हे लाजीरवाणे वाटते. उलट अण्णाभाऊंचे कार्य जगात अद्वितीय आहे हे ठणकावून सांगावेसे वाटते.
**- बाळासाहेब जोगदंड
साहित्यिक, छ. संभाजीनगर**


**व्यवस्थेकडून दुसरी अपेक्षा तरी काय करणार?**
ज्या व्यवस्थेने साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे ह्यांची सातत्याने उपेक्षा केली. त्या व्यवस्थेकडून दुसरी अपेक्षा तरी काय करणार?
आजच्या काळात अण्णा भाऊ साठे ह्यांच्या साहित्याने विचाराने गरीब कामगार क्रांती विचारांनी पेटून उठतील आणि प्रस्थापितांच्या सत्तेला सुरुंग लागेल ह्या भीतीने अण्णा भाऊ साठे असो वा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या चरित्राचे खंड असो, त्याच्या विचारांना प्रवाहित करण्याचे कार्य थंड पणे सुरू ठेवण्याचा व्यवस्थेचा प्रयत्न असतो. मी या ठिकाणी कोणत्याही पक्षाच्या किंवा सरकार वर राग व्यक्त न करता अगदी सुरुवाती पासून सातत्याने असेच होत आले आहे. ह्याकडे सुद्धा सर्वसामान्यांनी लक्ष दिले पाहिजे असे सांगू इच्छितो. 1954 पासून अनेक सुमार साहित्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला मात्र अण्णा भाऊ साठे ह्यांना त्या पासून वंचितच ठेवण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांच्या नावाने महामंडळे खूप अस्तिवात आली मात्र त्यांच्या कुटुंबाची आणि साहित्याची झालेली वाताहत थांबविण्यात ही व्यवस्था अपयशीच ठरली आहे असे म्हणावे लागते. **- किरण डोंगरदिवे, (काव्यप्रदेशातील स्त्री ह्या बहुचर्चित समीक्षा ग्रंथाचे लेखक) मेहकर जि. बुलढाणा**

**उपेक्षा थांबवावी आणि मंत्र्यांनी लक्ष घालावे :** सामान्य माणसांचे दुःख वेशीवर टांगून इथल्या पीडित, शोषित वर्गाचे दुःख, विरह, वेदना, त्यांचे जगणे, रडणे आपल्या साहित्याद्वारे जगासमोर मांडणाऱ्या थोर अश्या अण्णा भाऊंच्या साहित्याची राजकारणांच्या उदासिनतेमुळे उपेक्षा होणे हे खरे तर मराठी माणसांचे दुर्दैव आहे. केवळ दीड दिवस शाळा शिकलेल्या या साहित्यिकाची आयुष्यभर जशी उपेक्षा झाली तशीच उपेक्षा मरणानंतरही इथल्या राजकीय मंडळीकडून व्हाही हे मनाला चीड आणणारी बाब आहे. संबंधित विभागाचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जातीने लक्ष्य घालून अण्णा भाऊंच्या समग्र साहित्याचे आठ खंडाचे प्रकाशन करून ते वाचकांना उपलब्ध करून द्यावे.
**- अतुल ह. खंडगावकर, अक्षर जुळवणीकार, छत्रपती संभाजीनगर**

# शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरून ऊस शेतीकडे वळावे : श्रीराम शेटे

## लखमापूर येथे ऊस उत्पादक शेतकरी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**लखमापूर :** ऊस हे पीक असे आहे की जे शेतकऱ्यांना शंभर टक्के पैसा मिळवून देते त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरून ऊस शेतीकडे वळावे, असे मनोगत कादवा कारखाना विद्यमान चेअरमन श्रीराम शेटे यांनी ऊस उत्पादक सर्व शेतकरी बांधवांना संबोधित करताना आपले मनोगत व्यक्त केले. दिंडोरी तालुक्यातील लखमापूर येथील श्रीराम मंगल कार्यालयात सोमवारी सकाळी १०वाजता, शेतकऱ्यांसाठी ऊस पिक परी संवाद (शेतकरी मेळावा) आयोजित केला होता. त्यामध्ये ऊस विकास चर्चा, धरण व नदी पाणी परवाने,सोलर अनुदान पर मार्गदर्शन,लाईट विषयक अडचणी व इतर शेतकऱ्यांच्या अडचणी संधर्भात ऊस उत्पादक शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे होते. यावेळी त्यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना संबोधित करताना आपले मनोगत व्यक्त केले. श्रीराम शेटे साहेब म्हणाले की ऊस हे पीक असे आहे की जे शेतकऱ्यांना शंभर टक्के पैसा मिळवून देते त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरून ऊस शेतीकडे वळावे. ऊस लागवड ही जून ते सप्टेंबर दरम्यान केल्यास उसाचे उत्पन्न वाढीस नैसर्गिक मदत मिळेल डिसेंबर नंतर ऊस लागवड केल्यास ऊस उत्पादन वाढीस घट होते....उसाच्या दोन सरींमधील अंतर चार ते पाच फूट असावे दोन रोपांचे प्रमाण दीड फूट असावे.. इथून पुढे ठिबक सिंचनाचा वापर करूनच ऊस लागवड करावी जेणेकरून आपले एकरी टनेज कसे वाढेल याचा प्रयत्न करावा कमी क्षेत्रात जास्त टनेज काढावे यासाठी कारखाना ठिबक सिंचन, उसाची रोपे, बेणे आणि लागवडी पूर्वीचा डोस यासाठी लागणारे कर्ज देईन आणि त्याची परतफेड ऊस तोडणीच्या वेळेस अल्प व्याजाने केली जाईल तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ऊस लागवडीकडे वळावे. बाळासाहेब देशमुख, निखिल देशमुख, नितीन शिवाजीराव देशमुख या शेतकऱ्यांच्या वतीने काही प्रश्न उपस्थित केले होते त्यांनाही समर्पक उत्तरे देऊन समस्या जाणून घेतल्या. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस तोडीला प्रथम प्राधान्य द्यावे, याविषयी श्रीरामजी शेटे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतकरी बांधवांचे नुकसान होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाईल. आणि शेतकऱ्यांची ऊस तोड लवकर होईल व होणारे नुकसान टळेल.तसेच श्रीराम शेटे यांनी बोलताना सांगितले की तुम्ही रीतसर फॉर्म भरून पाणी आरक्षित करून घ्यावे, याचा शेतकरी बंधूंनी लाभ घ्यावा, आणि अतिशय महत्वाचे असे आवाहन करण्यात आले आहे की ऊस उत्पादकांनी ऊस हा कार्यक्षेत्रातील ऊस आपल्याच कारखान्यास द्यावा असे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी व्हॉ.चेअरमन शिवाजीराव बस्ते, संचालक राजेंद्र गांगुडे, विश्वनाथ देशमुख, गावातील ऊस उत्पादक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खामसवाडी येथे आई राजा उदो... उदो... च्या गजरात रोकडेश्वरी देवीची घटस्थापना

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** तालुक्यातील खामसवाडी येथिल आराध्य दैवत रोकडेश्वरी देवीची घटस्थापना दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता कळंब तहसील चे नायब तहसीलदार सांगळे व शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक कल्याण नेहरकर, सिद्धिविनायक ग्रुपचे दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या हस्ते देवीची पुजा व घटस्थापना करण्यात आली. यावेळी खामसवाडी सज्जाचे तलाठी माळवदकर, सरपंच आमोल पाटील व अशोक त्रिंबकराव शेळके, याञा कमिटीचे अध्यक्ष ज्योतिसिंग राठोड उपआध्यक्ष नीलेश पाटील, सचिव प्रभाकर शेळके, कमिटीचे सदस्य,धनंजय शेळके, अमर शेळके, सतिश माने, विजय शेळके, फुलचंद सावत, सादिक सय्यद, महादेव शेळके, देवीचे पुजारी शहाजी डोईफोडे यांच्यासह भक्तांच्या उपस्थितीत आई राजा उदो.. उदो... च्या गजरात घटस्थापना करण्यात आली. घटस्थापना झाल्यानंतर पुजेसाठी आलेले नायब तहसीलदार श्रीकिशन सांगळे, शिराढोण पोलिस ठाण्याचे स.पो.नि कल्याण नेहरकर व दत्ताभाऊ कुलकर्णी, मंडळ अधिकारी माटे, खामसवाडी सज्जाचे तलाठी माळवदकर व पोलीस पाटील विक्रम पांचाळ यांचा याञा कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील देवी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रा कमिटीचे अध्यक्ष ज्योतिसिंग राठोड यांनी असे आवाहन केले की, रोकडेश्वरी देवीची यात्रा व नवरात्र महोत्सव मोठ्या उत्सवात साजरा होणार असल्यामुळे परिसरातील देवी भक्तांनी याञेत सहभागी होऊन रोकडेश्वरी देवीची नवरात्र यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले. तर रोकडेश्वरी देवीची घटस्थापना मोठ्या उत्साहाने आई राजा ऊदो... ऊदो...च्या गजरात केली असून नऊ दिवस ढोल ताशाच्या तालावर लेहजीम खेळत-खेळत गावातून देवीच्या पालखीची मिरवणूक काढली जाते. यामध्ये दोन लेहजीम पार्टीचा समावेश असतो. यामध्ये अंबिका लेझीम मंडळ व जगदंबा लेहजीम मंडळ असे दोन मंडळे सात दिवस लेहजीम खेळतात. गावातून देवीची पालखीत मिरवणूक काढुन अष्टमीला बोलके देखावे करून ऐतिहासिक व पौराणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक असे वेगवेगळे बोलके देखावे करून त्या देखाव्याची पालखीसह गावातून मिरवणूक काढली जाते. नवमीला मोठी यात्रा भरली जाते. तरी परिसरातील देवी भक्त मोठ्या उत्साहाने हा नवरात्र उत्सव पार पाडतात. तर नवमीला मोठी यात्रा भरणार आहे. परिसरातील भाविक भक्तांनी या यात्रेचा लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटीचे सचीव प्रभाकर शेळके यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाघांची शिकार, बावरीया टोळीच्या पाच जणांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बावरीया टोळीने राजोली फाल येथे दोन वाघांची शिकार केल्याप्रकरणी वनविभागाने सोमवारी गुवाहाटी येथून बावरीया टोळीच्या आणखी पाच आरोपींना अटक केली आहे. राजवंती बावरिया, मायावती बावरिया, रामदास बावरिया, अर्जुन सिंग बावरिया, प्रकाश बावरिया अशी अटकेतील आरोपींची नावे असून यात दोन महिलांचाही समावेश आहे. वाघाच्या शिकारप्रकरणी आरोपींची संख्या आठ वर पोहोचली असून आणखी संशंयितांची नावे समोर आल्याने आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

# आ. रोहीत पवार यांची युवा संघर्ष यात्रा नव्या पर्वाची नांदी ठरणार

## अमित पाटील खडसे यांचे प्रतिपादन : वाशिम जिल्ह्यातील युवकांची उत्सुकता वाढली

आधुनिक केसरी न्यूज




**वाशीम :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने पक्षाचे युवा नेते आ. रोहीत पवार विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर ' युवा संघर्ष यात्रेचा ' शुभारंभ करणार आहेत. राज्यातील युवकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा उहापोह यानिमित्ताने आ.पवार करणार आहेत. त्यामधे प्रामुख्याने स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, डिग्री असूनही काम नसणारे विद्यार्थी, आर्थिक अडचणीत असलेले विद्यार्थी आणि बेरोजगार तरुणांसाठी संघर्ष करण्याच्या उद्देशाने सदर यात्रा निघणार आहे. जवळपास ८२० किलोमिटरची ही संघर्ष पदयात्रा १३ जिल्ह्यातून प्रवास करणार आहे. त्या अनुषंगाने आ. रोहित पवार दसऱ्याच्या शुभपर्वावर ' सीमोल्लंघन ' करणार असून वाशिम जिल्ह्यातील युवकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तरूणाईचा हा उत्साह पाहता, युवा संघर्ष यात्रा राज्यात एका नव्या पर्वाची नांदी ठरणार असल्याचे प्रतिपादन जिल्ह्यातील युवा नेते तथा जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांनी केले आहे. रिसोड येथे युवा संघर्ष यात्रे संदर्भात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ते बोलत होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस पंकज नाना बोराडे, युवक प्रदेश सरचिटणीस रविकांत वरपे, हिंगोली जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष अनिल पतंगे, जिल्हा परिषद सदस्य रवीभाऊ गडदे, सेनगावचे नगराध्यक्ष राजूभाऊ देशमुख, आणि



वाशिमचे युवा नेते अमित पाटील खडसे यांनी नुकताच युवा संघर्ष यात्रेच्या मार्गक्रमणाचा आढावा

घेतला असून, मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या वलाना या गावापासून वाशिम पर्यंत अमित पाटील खडसे हे संघर्ष यात्रेची जबाबदारी सांभाळणार आहेत. व्याड ,चिखली, वनोजा, कोयाळी, आसेगाव, बेलखेड, शेलगाव, मौजारोड मार्गे संघर्ष यात्रा वाशिम येथे पोहोचणार आहे. त्यानिमित्ताने नियोजनासंदर्भात रिसोड येथे घेतलेल्या युवा कार्यकर्त्यांच्या बैठकीत अमित पाटील खडसे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, " सद्यस्थितीत राज्यातील बदललेल्या राजकारणामुळे तरुणांची राजकारणाकडे बघण्याची मानसिकता ही बदलत चालली आहे..! तरुणांचे अनेक प्रश्न राज्य सरकारकडे प्रलंबित असून, त्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आ.रोहित पवार यांनी युवा संघर्ष यात्रेचे आयोजन केले आहे. त्यानिमित्ताने अनेक प्रश्नावर चर्चा करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कॉन्ट्रॅक्ट भरती रद्द करावी, तलाठी भरतीसाठी घेतलेले पैसे परत करावे, शाळा दत्तक जी.आर. रद्द करावा, जिल्हा परिषद शाळा बंद केल्या जात आहेत त्या करू नये. तसेच जिथे एमआयडीसी आहे तेथे उद्योग आणावे आदी अनेक मागण्यासाठी युवा नेते तथा आ.रोहीत पवार ही यात्रा काढत असल्याचे अमित पाटील खडसे यांनी यावेळी सांगितले आहे. याप्रसंगी कैलास पाटील खानझोडे यांच्यासह, मालेगावचे तालुका अध्यक्ष भगवानराव शिंदे, रिसोडचे तालुका अध्यक्ष गजाननराव सरनाईक, भानुदास पाटील मवाळ, मुरलीधर जुनघरे, नितीन सरकटे, किशोर लहाने, प्रा. गायकवाड, रवी पाटील नरवाडे, गजानन तिरके, शुभम टकले, पुरुषोत्तम नरवाडे, ओम खडसे, पंजाब खडसे आदीसह शकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# सीसीटीएनएस मूल्यांकनात नाशिक पोलीस प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** ऑगस्ट २०२३ चे सीसीटीएनएस मूल्यमापन जाहीर झाले असून यामुळे सलग दुसऱ्यांदा नाशिक पोलीस प्रथम आले आहेत.

पोलीस स्टेशनला दाखल होणारे सर्व गुन्हे, आरोपी यासह सर्व पोलीस कामकाजाची माहिती संगणकीय यंत्रणेत भरून ती जतन करण्यासाठी सन २०१५ पासून सीसीटीएनएस (क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स्) ही यंत्रणा देश पातळीवर सुरू करण्यात आली आहे. राज्यभरातील पोलीस घटकांकडून चालणारे सीसीटीएनएस कामकाजाचे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून दरमहा परीक्षण केले जाते. माहे जुलै २०२३ या महिन्याच्या मूल्यमापनात नाशिक ग्रामीण घटक प्रथम क्रमांकावर आला होता. नुकतेच ऑगस्ट २०२३ चे मूल्यमापन जाहीर झाले असून



यातही नाशिक ग्रामीण घटकास अव्वल स्थान प्राप्त झाले आहे. याप्रमाणे नाशिक ग्रामीण घटकाने सीसीटीएनएस मधील मूल्यांकनात प्रथम येण्याचा मान सलग दुसऱ्यांदा मिळविला आहे. जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी सीसीटीएनएस शाखा कार्यरत असून या शाखेत काम करणाऱ्या महिला अंमलदार मपोना / सिमा उगलमुगले, मपोना / ज्योती आहिरे, मपोशि/ प्रतिभा शिंदे व मपोशि/ कविता भोर यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल या सर्वांचे पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी अभिनंदन केले असून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# युवतीचा गळा दाबून खून : दोघे अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** सोयाबीन काढणी व ट्रॅक्टर कामासाठीसाठी पुण्याहून आलेल्या पश्चिम बंगालच्या मजूर  युवतीचा सोबत असलेल्या दोघांनी गळा आवळून खून केला. ही घटना १३ ऑक्टोबर रोजी रात्री चिखली तालुक्यातील चंदनपुर येथे उघडकीस आली. याप्रकरणी १४ ऑक्टोबर रोजी दोन्ही युवकांविरुद्ध प्रथम खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिखली  तालक्यातील अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चंदनपुर येथील रहिवाशी असलेले अंनथा तुकाराम इंगळे यांच्याकडे सोयाबीन काढण्याचे ट्रॅक्टर व थ्रेशर मशीन आहे. मुलगा भागवत अंनथा इंगळे याने त्याचा गावातीलच मित्र पुणे येथे सुपरवायझर असलेला नकुल मोतिसिंग इंगळे यास कामासाठी मजूर पाठविण्याचे सांगितल्याने नकुल इंगळे याने चार मुले गावाकडे पाठवून दिले होते. परंतु १३ ऑक्टोबर रोजी भागवत इंगळे हा मेरा




खुर्द फाट्यावर मजुरांना घेण्यासाठी गेला. यावेळी तेथे अल्लीउद्दिन मिया अजीजार रहेमान वय 21, जाकीर अलादाई  मुट्ट उलदाई वय 20 एक युवती रा. पश्चिम बंगाल हे आल्याने या तिघांना गावी आणले. त्यांना राहण्यासाठी जुलालसिंग संपत इंगळे यांचे पडीत घर दिले . मात्र त्यांच्याकडे कपडे नसल्याने थ्रेशर मालक भागवत इंगळे यांनी दोघांना मेरा बु.येथील  कापड केंद्रावरून कपडे घेवून दिले. तसेच दारुसाठी २५० रूपये दिले. दम्यान रात्रीच्या १२ ते १ वाजेच्या भागवत इंगळे हे शेतात मोटार चालू करण्यासाठी जात असतांना घराचा दरवाजा उघडा दिसला. मात्र घरातून कोणाचाही आवाज न आल्याने  त्यांनी घरात प्रवेश केला असता त्यांना युवतीचा मृतदेह  दिसला. तर अल्लीउद्दिन मिया अजीजार रहेमान वय 21, जाकीर अलादाई  मुट्ट उलदाई वय 20 हे फरार झाले. घटनेची माहिती मिळताच अंधेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्यासह घटनास्थळी पोहचून पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी अंधेरा पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. तर या प्रकरणी जिल्हा पोलिस अधीक्षक कडासने यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी व ठाणेदार विकास पाटील यांनी गुन्हा दाखल करून शोध घेत असताना सीसीटिव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे  संशयित आरोपी रेल्वेने जात असताना वसई  रेल्वे स्थानकावर रेल्वेतून अटक करण्यात आली.  सदर कारवाई ठाणेदार पाटील यांच्यासह पथकाने केली. 24 तासाचत खुनाचा छडा लावल्याने पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिल्हा परिषद शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** मोलखेडा येथे दि. १५ आक्टोबर रोजी जिल्हा परिषद येथे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती आयोजित करण्यात आली. डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना शिक्षकवृंद यांनी आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे केंद्र प्रमुख एस बी राठोड मॅडम व मुख्याध्यापक सुभाष अवधूत सर हे उपस्थित होते.तर प्रमुख पाहुणे माजी सरपंच त्र्यंबक शिनगारे तर याप्रसंगी डॉ एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन परिचय व त्यांनी केलेले कार्य याबद्दल संदीप कळसकर सर  यांनी माहिती व्यक्त केली. यांनी डॉ एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन व वाचनाचे महत्त्व या विषया वर प्रकाश टाकला. जिल्हा परिषद शाळेचे शिक्षकवृंद, शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच प्रास्ताविक करतांना म्हणाले की आपला भारत देश विविध संस्कृतीने नटलेला आहे त्यापैकी वाचन संस्कृती



एक आहे त्या संस्कृतीची जोपासना केल्यास व्यक्तीच्या जीवनाला एक आकार येतो, माणुसकी येते व त्यातून मानव घडतो. आज नवरात्र प्रारंभ झाली आहे पूर्ण देशात ग्रंथ वाचन लोक करीत आहेत व आपली संस्कृती जोपासत आहेत. अध्यक्षीय समारोप करतांना शाळेचे शिक्षक बाजळुंगे सर व आनंदा वारंगणे तथा कवी यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले की  ग्रंथालय हा एक महत्वपूर्ण भाग आहे वाचन प्रेरणा दिवस पूर्णपणे साजरा होण्यासाठी आठवड्यातून एक दिवस ग्रंथ वाचन दिवस म्हणून पूर्ण जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी दोन तास जिथे बसले तिथे पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. वेगवेगळ्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या घेतल्या पाहिजेत यातून जास्तीत जास्त विद्यार्थी ग्रंथालयात वाचक म्हणून उपस्थित राहतील. केंद्र प्रमुख एस बी राठोड मॅडम यांनी कार्यक्रमात विशेष उपस्थिती दर्शवून कार्यक्रम चे आभार प्रदर्शन केले.यावेळी शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध व्यवसाय विरोधी पोलीसांचे अभियान

## मागील ८ दिवसांत ११९ आरोपींविरुध्द ७० गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मागील काही महिन्यांपासून नाशिक ग्रामीण पोलीसांनी अवैध व्यवसायांविरोधी अभियान छेडले असून जिल्हयातील सर्व प्रकारचे अवैध व्यवसाय बंद करण्यासाठी, स्थापित करण्यात आलेल्या ०८ विशेष पथकांसह अवैध दारू निर्मितीची ठिकाणे उध्वस्त करण्यासाठी मुख्यालयाकडून महिला पोलीस अंमलदारांची ०३ पथके देखील गठीत करण्यात आली आहेत. जिल्हयातील अवैध मटका-जुगार, गुटखा,अंमली पदार्थ,वेश्याव्यवसाय,अन्न भेसळ यासह सर्वच प्रकारच्या व्यवसायांवर कारवाया करण्यात येत आहेत. नाशिक ग्रामीण पोलीसांनी जिल्हयातील गुटखा हद्यपार करण्यासाठी यापूर्वी तीन अभियान राबवले असून दिनांक ०६/१०/२०२३ रोजीपासून गुटखा विरोधी अभियान सुरू करण्यात आले आहे. मागील (८) दिवसांत नाशिक ग्रामीण पोलीसांनी, अवैध व्यवसायांविरूध्द एकूण ७० ठिकाणांवर छापे टाकून कारवाई केली आहे. यात



मुंबई दारूबंदी कायद्याखाली ३६, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याखाली १५, गुटखा विरोधी १८ कारवायांचा समावेश असून निफाड पोलीस ठाणे हद्दीतील बोकडदरे शिवारात भेसळयुक्त दूध बनवणाऱ्या इसमांवर अन्न सुरक्षा मानके कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. पथकांनी केलेल्या सदर कारवायांत एकूण ११९ आरोपींना ताब्यात घेण्यात आलेअसून एकूण १८ लक्ष १७ हजार रूपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. जिल्हयातील सर्व अवैध व्यवसाय हद्दपार करण्यासाठी अशा व्यवसायांची माहिती पोलीसांपर्यंत पोहोचावी, या दृष्टिकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी खबर ही हेल्पलाईन सुरू केली असून,नागरिकांनी ६२६२ २५ ६३६३ या हेल्पलाईनवर संपर्क साधून आपल्या परिसरात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती नाशिक ग्रामीण पोलीसांना द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय सत्यशोधक निबंध स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** सत्यशोधक बहुउद्देशिय सामाजिक संस्था मांडकी (ता. पुरंदर) यांच्या वतीने राज्यस्तरीय सत्यशोधक निबंध स्पर्धा-२०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे.१) मी भारतीय संविधान बोलतोय २) भारतीय संविधानिक हक्क, अधिकार व जागृत नागरिकांची कर्तव्ये, जबाबदारी या दोन विषयांवर आधारित ही स्पर्धा घेण्यात आलेली आहे.या स्पर्धेत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन सत्यशोधक बहुउद्देशिय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विशाल धेंडे यांनी केलेले आहे.  डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठया कष्टाने संविधानातून आपल्याला हक्क आणि अधिकार दिलेले आहेत.ते हक्क आणि अधिकार काय आहेत.हे लोकांना कळणे गरजेचे आहेत.इथल्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांनासुद्धा हे माहीत असणे गरजेचे आहेत. जोपर्यत संविधान राहील तोपर्यंत आपले हक्क आणि अधिकार अबाधित राहणार आहेत. त्यामुळे संविधानाची जनजगृती करण्यासाठी संविधान दिनाच्या अनुषंगाने संविधाना वर आधारित मी भारतीय संविधान बोलतोय, भारतीय संविधानिक हक्क,अधिकार व जागृत नागरिकांची कर्तव्ये,जबाबदारी हे विषय देऊन हे स्पर्धेचे नियोजन करण्यात आलेले आहे.ही स्पर्धा लहान गट आणि मोठा गट असे दोन गटात होणार असून लहान गट हा वय वर्ष १० ते १८ वर्ष पर्यंतचा असेल.

# शारदीय नवरात्र श्री रेणुकामाता देवी उत्साहाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथील श्री रेणुकामाता देवी शारदीय नवरात्र महोत्सवाची मोठ्या उत्साहाने सुरवात करण्यात आली.पहिल्याच दिवसी  घटस्थापना,वस्त्र अलंकार परिधान, अभुषण अभिषेक, गुरु बाळासाहेब मुळे यांच्या हस्ते पुजा, आरती करत नवरात्र महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. बाजार सावंगी येथील रेणुका माता देवी जागृत आराध्य दैवत असुण गाव परिसर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांची देवीवर मोठा विश्वास श्रद्धा आहे.

# विनोद विरघट सरांची वडिलांना जलरूपी आदरांजली

## स्मशानभूमीत वडिलांचा स्मृतिदिन, जलकुंभाचे उद्घाटन करून भोजनाची व्यवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** तेल्हारा तालुक्यातील ग्राम भानापुर येथील विनोद विरघट सर यांनी वडीलांचा प्रथम स्मृती दिन गावातील स्मशान भुमीला सर्व सुविधा युक्त अशी पाण्याची टाकी दान देऊन जलरुपी आदरांजली वाहली.

महाराष्ट्र हा पुरोगामी विचारसरणीचे राज्य आहे याची वारंवार प्रचीती येते. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्याने व विचाराने महाराष्ट्राची ओळख जगाच्या पाठीवर निर्माण झाली आहे. समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्यावर आधारित सर्व सामान्य माणसाला सन्मानाचे, स्वाभिमानाचे व प्रगतीचे जिवन जगण्यासाठी प्रेरणा देणारे महान नायक म्हणजेच फुले शाहु आंबेडकर होत. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्य व विचाराशी प्रामाणिक राहुन आणि सामाजिक जबाबदारी स्विकारून विनोद विरघट सर यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक कामाला सहकार्य करून स्वतःला फुले शाहु आंबेडकर यांचे वैचारीक वारस असल्याचे सिद्ध करून दिले. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वाचनालय सुरू करुन अनेकांना शिक्षणासाठी मोठा आधार दिला. विनोद विरघट यांचे वडील दिवंगत प्रल्हादराव विरघट यांच्या प्रथम स्मृतीदिना निमित्त गावातील स्मशानभूमीला सर्व प्रशस्त असा जलकुंभ दान देऊन एक क्रांती करून अंधविश्वास दुर करण्याचा प्रयत्न केला. स्मशानभूमीत वडीलांचा प्रथम स्मृती दिन, जलकुंभाचे उद्घाटन करून लोकांना स्मशानभूमीत च भोजनाची व्यवस्था करून स्मशानालाही आदराचे स्थान निर्माण करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. वडीलांच्या प्रथम स्मृतीदिना निमित्ताने आयोजित जलकुंभ उद्धाघट सोहळ्याला विनोद विरघट सरांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र करून एक खुप मोठा आदर्श समाजा समोर ठेवला. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना समाज एकता अभियान अंतर्गत मानचिन्ह देऊन सन्मानित सुद्धा करण्यात आले. वडिलांचा स्मृतीदिन हा समाजातील लोकांना जागृत करून प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल अशा




पद्धतीने त्यांनी साजरा करून एक नविन पायंडा पाडला.

या ऐतिहासिक सोहळ्याचे अनेक मान्यवर साक्षीदार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावच्या सरपंच सपना धम्मपाल वाकोडे या ह्या तर कार्यक्रमाची सुरवात ही भंते शाक्यपुत्र राहुल यांच्या धम्म देसनेने झाली. जलकुंभ लोकार्पण सोहळा हा उपस्थित सर्वच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या मध्ये मा. बळवंतराव अरखराव सर (उप विभागीय अधिकारी अकोट), प्रा. मुकुंद भारसाखळे (प्रतिष्ठान अकोला) मा. संदिपपाल महाराज (सत्यपाल महाराज यांचे शिष्य), मा. रामपाल महाराज (सत्यपाल महाराज यांचे शिष्य), मा. शेषराव टाले (मुख्याधिकारी न. प. बाळापूर), मा. सतिश प्रघणे (अध्यक्ष, समाज एकता अभियान, पुणे) सुकेशनी जमधाडे (पोलीस अधिकारी, मुंबई) मा. अण्णासाहेब बोदडे (सहा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका), मा. सेवानंद तायडे(पोलीस अधिकार, दही हंडा), मा. भास्कर तायडे( पाणी पुरवठा अधिकारी, नागपूर), मा. श्रीकृष्ण झाडोकार (निरीक्षण, जि एस टी पुणे), सचिन गावंडे (प्रबुद्ध गृप, अकोला) सुमेध घनबहादुर (समन्वय अकोला) आदी मान्यवर उपस्थित होते. या लोकार्पण सोहळ्याला विनोद विरघट सरांचे मित्र, नातेवाईक, हितचिंतक तसेच गावकरी यांचीही उपस्थिती होती. मा. संदिपपाल महाराज व मा. रामपाल महाराज यांच्या विनोदी व प्रबोधनात्मक शब्दांनी लोकांचे प्रबोधन केले. या ऐतिहासिक स्मृतीदिन व जलकुंभ लोकार्पण सोहळ्याची चर्चा महाराष्ट्र भर होत आहे.

# रिधोरा देवी येथील भाविकांचे ग्रामदैवत रेणुका माता

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील रिधोरा देवी येथील रेणुका देवी मंदिरांमध्ये 15 तारीख पासुन नवरात्रोत्सव सुरू होत असून घटस्थापनेनंतर दसऱ्यापर्यंत सर्वत्र उदोकार सुरू होईल. विविध कार्यक्रमांची भाविकांसाठी पर्वणी असेल. रिधोरा देवी येथील नवरात्रोत्सव निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून दररोज विविध धार्मिक व अन्य कार्यक्रम होईल रेणुका देवी मंदिरात नवरात्राची तयारी पूर्ण झाली आहे. रेणुका मातेच्या मुख्य गाभाऱ्याची स्वच्छता पूर्ण झाली आहे. रेणुकामातेचा नवरात्रोत्सव नऊ दिवसांचा असतो. रेणुकादेवीच्या नवरात्रोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. 'आई राजा उदो, उदो... रेणुका माता की जय'च्या जयघोषात, वेदमंत्रोच्चारात रविवारी सकाळी पाच वाजेच्या सुमारास श्री रेणुकादेवीची



घटस्थापना होऊन आरती होईल. या दिवसापासून सकाळी 4 वाजेपासून सर्व पंचक्रोशीतील मोठ्या प्रमाणात भाविकांची दर्शनासाठी गर्दी राहते. नऊ दिवस अखंड हरिनाम सप्ताह निमित्त किर्तनचा कार्यक्रम रंगतील. त्यात भक्तिसंगीत, भजन आदींचा समावेश असेल. तोरणांनी मंदिर सजले आहेत. मंडप व आंब्याच्या तोरणांनी मंदिर परिसर सजला आहे. रिधोरा देवी येथील ग्रामदेवता असलेल्या रेणुका मातेचे नवरात्रोत्सव साजरे होतात. त्यात अश्विन महिन्यातील नवरात्रोत्सव हा दसरा उत्सव म्हणून साजरा होतो, तर चैत्र पौर्णिमा महिन्यात रेणुका देवीची मोठ्या प्रमाणात यात्रा भरली जाती. रविवारी सुरू होणाऱ्या उत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, सकाळी रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष गणेश कोलते यांच्या हस्ते महापूजा होईल. यावेळी अशोक शिंदे, देविदास शिंदे, भास्कर कोलते, सुनील सोळुंके, भाऊसाहेब शिंदे, संदिप कोलते, विशाल शिंदे, मंगेश शिंदे सोपान कोलते, गणेश बडुगे, माणिकराव कोलते यांनी गावातील ग्रामस्थ व प्रचकोशितील गावकरी यांना उपस्थित राहण्याचे आवाहन रेणुका देवी संस्थानच्या कमिटीने केले आहे.

# फुलंब्री पं.स. मेरी माटी, मेरा देश अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पंचायत समिती कार्यालयात मेरी माटी, मेरा देश मिट्टी को नमन अभियान माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी दि.१३ रोजी संपन्न झाले. झाला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, तालुकाध्यक्ष सांडू जाधव, सहायक गटविकास अधिकारी राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालया मार्फत आलेल्या अमृत कलशातून माती काढून एक प्रातिनिधीक स्वरूपात एक कलश आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला नेहरू युवा केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त केलेले स्वयंसेवक महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पखवाज वादक आकाश महाराज निकम व हरी शाम चोपडे व सुप्रसिद्ध भारूडकार प्रा. शरद काकडे यांच्याकडे अमृत कलश सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती सर्जेराव मेटे, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बाळासाहेब तांदळे, विकास गायकवाड, पंचायत विस्तार अधिकारी म्हस्के, अनिल पवार तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक पंचायत समिती चे सर्व कर्मचारी उपस्थीत होते.

# विविध मागण्यांसाठी भारत राष्ट्र समितीचे बोंबाबोंब आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत राष्ट्र समितीच्या धुळे जिल्हा शाळेतर्फे समन्वयक ईश्वर पाटील यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि १६ ऑक्टोबर रोजी धुळे शहरातील क्युमाईन क्लबसमोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात आलं. सारकारी विभागात कंत्राटी भरती व ६२ हजार सर्व सरकारी शाळा कार्पोरेटला चालवायला देण्याच्या निर्णयांचा या आंदोलनातून निषेध करण्यात आला. मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीच्या गुंतवणूकदारांना न्यायालयीन गती मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करावे. धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा कंपन्यांच्या दुट्टपीपणामुळे संपूर्ण जिल्ह्याला पीक विमा मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. अक्कलपाडा माध्यम प्रकल्पासह जिल्ह्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करावेत.

शेतकऱ्यांना शेतीसाठी बारमाही पाणी मिळावे. जिल्ह्यात मायक्रो फायनान्स कंपन्या मोठ्या प्रमाणात सावकारीचा व्यवसाय करतात. त्यांच्याकडून जनतेची होणारी लूट थांबवावी. रासायनिक खते व बियाणे, कीटकनाशके, बोगस कंपन्या व वितरकांवर फौजदारी गुन्हे दाखल शेतकऱ्यांना




कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळण्याचा कायदा करावा. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर यांचे गुरे-ढोरे, इलेक्ट्रिक मोटारी, पंप चोरीचा धुमाकूळ सुरु आहे. शेतकऱ्यांना याबाबत न्याय मिळवून देण्यात पोलीस यंत्रणा कुचकामी ठरत आहे. जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील रस्ते दुरुस्त करावेत या मागण्यांसाठी हे बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भारत राष्ट्र समितीचे जिल्हा समन्वयक ईश्वर पाटील नाना पाटील, लोक क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब तुळशीराम माळी यांच्या नेतृत्वाखाली लोटन पाटील, दीपक पाटील, शोभा पाटील, कृष्ण ठाकरे, अमृत महाले, रोहिदास पवार, चंपालाल ठाकरे, रामलाल गवळी, मनीषा पाटील, नयना जाधव, रमेश सरदार, राधाबाई पवार, संगीता मोरे, ओंकार जाधव, ॲड. संदीप पाटील इत्यादी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# गव्हाली येथील तरुणांच्या आत्महत्या प्रकरणी गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील गव्हाली येथे तरुणाने ३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी रहात्या घरा समोर विषारी औषध प्राशन करून आत्महात्या केली होती . या तरुणांनी डाव्या हातावर पेनाने " माझी बायको मला . . " असे लिहीत चिठ्ठी मिळून आली होती त्यात साडू - सासू व पत्नी यांच्या त्रासाला कंटाळून आत्महात्या करत असल्याचे लिहीले होते या मुळे अखेर तरुणाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून वडोद पोलीसात पत्नी - सासु - साडु यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गव्हाली ता सिल्लोड येथील तरुण भाऊसाहेब पांडूरंग शिंदे वय २९ यांने ३ ऑक्टोबर २०२३ रोजी संध्याकाळी रहात्या घरा समोर विषारी औषध प्राशन करून आत्महात्या केली . त्याने चिठ्ठी लिहून ठेवली होती त्यात त्याने लिहीले आहे की मी भाऊसाहेब शिंदे मरनार आहे तरी मरनास कारण माझी पत्नी आणि माझी सासु आणि माझा साडु यांचे नाव सोनाली शिंदे शिंदुबाई विष्णु बोराडे रा. उडणगाव आणि माझा साडु आजिनाथ पंडीत रा. खुल्लोड) हा माझ्या आयुष्यात वर्षापासून माझ्या बायकोला फोन करतो . माझ्या पत्नीला जाळ्यात फसवतो मी आणि माझ्या जवळ खुप पैसा आहे मि तुला फिरायला नेईल तुला जे पाहीजे ते देईल असे ही सांगतो. माझ्या सासुनेही तीला सोनालीला विकण्याचा प्रयत्न केला . मी माझ्या सासुच्या फोनवर फोन केला पण ती फोन उचलत नाही माझ्या फोनवर फोन करू नको असे मला म्हणाली माझ्या पत्नी सोबत ही बोलु देत नाही. असा मजकुर लिहून ठेवत हातावर माझी S बायको मला ... असे पेनाने लिहून ठेवले होते . भाऊसाहेब याने चिठ्ठी व हातावर लिहून आत्महात्या केली असल्याचे उघड झाले . मयत तरुणाची आई कांताबाई शिंदे यांच्या फिर्यादी वरून भाऊसाहेबच्या मरणास कारणी भुत असलेल्या त्याची पत्नी सोनाली शिंदे रा गव्हाली ह मु उंडणगाव , शिंदुबाई विष्णु बोराडे रा. उंडणगाव आणि मुलाचा साडु आजिनाथ छगन पंडीत रा. खुल्लोड ता सिल्लोड यांच्या विरुद्ध माझा मुलगा भाऊसाहेब याची पत्नी सोनाली शिंदे, सासु सिंदुबाई विष्णु बोराडे , साडु अजिनाथ छगन पंडीत यांचे त्रासामुळे मुलगा भाऊसाहेब याने काहीतरी विषारी औषध पिऊन मयत झाला आहे. त्याचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे अशा १४ ऑक्टोंबर रोजी दिलेल्या फिर्यादी वरून वडोद पोलीसांन स पो नि विलास मोरे यांच्या मार्गदर्शना खाली पो हे कॉ मदने यांनी गुन्हाची नोंद केली असून पुढील तपास बीट जमादार खाकरे हे करीत आहेत.

# न्यायालयातील पार्किंग आणि झाड वाचवायला वकील सरसावले !

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जुन्या उच्च न्यायालयाच्या इमारतीतील पार्कींग बंद करुन तेथे कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधिशांसाठी बंगले बांधण्यास विरोध करण्यासाठी पार्कींग व झाड बचाव कृती समितीने आवाहन केल्याप्रमाणे सोमवारी दि. 16 ऑक्टोबर 023 रोजी 12.30 वाजता समिती तर्फे मुक निदर्शनेही करण्यात येणार आहेत. जुन्या उच्च न्यायालयाच्या इमारतीतील पार्कींग बंद करुन तेथे कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधिशांसाठी बंगले बांधण्यास वकीलांचा विरोध करण्यासाठी न्यायालयातील पार्कींग व झाड बचाव कृती समितीने आवाहन केल्या प्रमाणे वकील मोठ्या संख्येने पार्कींगच्या जागेवर जमा झाले होते. पार्कींग बंद करण्यास व झाड तोडण्यास विरोध असल्याबाबतचे पार्कींगच्या ठीकाणी बॅनर लावुन सविनय विरोध दर्शविला. याच पार्कींगमध्ये पक्षकारांसाठी प्रसाधन गृह देखील आहे ते देखील बंद करण्यात आले. या इमारतीत विविध 14 न्यायालये व अनेक कार्यालये आहेत. ही इमारत केवळ कौटुंबिक न्यायालयाची नाही. या इमारतीच्या दुसर्या बाजुला गरजेपेक्षा जास्त जागा कौटुंबिक न्यायालयाला दिलेली असतांना न्यायालयाच्या दर्शनी भागात व पार्कींगच्या जागेत बंगले बांधु नये याबाबत मराठवाडा लेबर लॉ प्रॅक्टीशनर्स असोसिएशन माननीय प्रशासकीय प्रमुख न्यायमर्ती, मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व पालक न्यायमुर्ती औद्योगिक व कामगार न्यायालये, मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांना निवेदने पाठविण्यात आली होती. त्यानंतर न्यायमुर्ती रविंद्र घुगे व न्यायमुर्ती वाय जी खोब्रागडे साहेबांनी स्वतः येऊन पाहणी देखील केली होती. पुन्हा बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यानंतरही झाड तोडण्यासाठी येणार असल्याचे कळाल्याने व जागेवर बांधकामासाठीचे लोखंड आणुन ठेवल्याने आज वकील मोठ्या संख्येने विरोध करण्यासाठी जमा झाले. परंतु आज झाड तोडण्यासाठी कोणी आले नाही, दोन दिवसाच्या सुट्टीचा गैरफायदा घेऊन झाड तोडतील म्हणुन वकीलांनी विरोधाचे बॅनर त्याठीकाणी चिटकवले. येथुन पुढचे आंदोलनासाठी मराठवाडा लेबर लॉ प्रॅक्टीशनर्स असोसिएशन, बार असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीयल लॉयर्स, जिल्हा वकील संघ, ॲडव्होकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ औरंगाबाद या विविध संघटनांची कृती समिती तयार झाली असुन त्यास जुने उच्च न्यायालय पार्कींग व झाडे बचाव कृती समीती स्थापन करण्यात आली.

# श्रीमंत राजे अंबरीश आत्राम यांच्या जन्मदिनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## राजेंच्या चाहत्यांचा दानशूरचा राजा गणेश मंडळाकडून लाडूतुला करताना मोठ्या उत्सवाचे स्वरूप!

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** अहेरी इस्टेटचे श्रीमंत राजे माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा, विदर्भातील नामांकित धर्मराव शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजे अम्ब्रिशराव आत्राम यांना त्यांच्या जन्मदिवसानिमित्त राजनगरीत मोठ्या रोषणाई, आतिषबाजी आणि डीजेच्या गजराने संपूर्ण राजनगरी दुमदुमली. उपविभागातील राजघराण्याशी संबंधित गणमान्य व्यक्ती, स्थानिक व्यापारी संघटना, विविध सामाजिक संस्थांची तथा पक्षांचे पदाधिकारी तसेच धर्मराव शिक्षण मंडळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व नगरातील वार्डा- वार्डातील महिलांनी पुष्पगुच्छ व भेट देऊन राजे साहेब यांच्यावर शुभेच्छांच्या वर्षाव केला.सकाळी अहेरी येथील उपजिल्हा रुग्णालयात भाजपातर्फे गरजू रुग्णाला व प्रसूती मातांना फळ, बिस्कीट वाटप करण्यात आले. यात अहेरी नगर पंचायतचे भाजपा गटाचे नगर सेवक, नगर सेविका आणि भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. राजे साहेबांच्या जन्मदिवसाला अहेरितील प्रसिद्ध दानशूर चा राजा गणेश मंडळाकडून अहेरी येथील दानशूर चौकात भव्य स्वरूपात रोषणाईत मोतीचुर लाडूने तुलाभार करण्यात आले. यावेळी हजारोंचा संख्येत या आनंदमयी क्षणाला राजनगरितील जनता तसेच अहेरी विधानसभा क्षेत्रातील जनता तसेच लागून असलेले तेलंगाना राज्यातील लोकांची गर्दी होती. त्यानंतर राजे साहेब यांच्या आझाद चौकात शिव जन्मोत्सव समिती व आझाद गणेश मंडळ अहेरीतर्फे महाराज २०२४ आकाराचे राजेंच्या हस्ते केक कापून समितीने शुभेच्छा दिली. त्यातून आगामी विधानसभा निवडणुकीचा निकाल काय असणार याची जणू पुर्वकल्पनाच दिल्या गेली. यावेळी बाल, तरुण, महिला चाहत्यांची अफाट गर्दी होती. चाहत्यांची तर सेल्फी फोटो करीता चक्क रांग लागली होती. राजे साहेब यांचे दिवसेंदिवस चाहत्यांची संख्या अगणित वाढत असल्याचे दिसून येत आहे. अहेरी विधानसभा क्षेत्रातील अहेरी, सिरोंचा, भामरागड, एटापल्ली आणि मुलचेरा या तालुक्यात विविध ठिकाणी राजे साहेबांच्या जन्मदिसानिमित्त विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आले त्यात रक्तदान शिबिर, फळ वाटप, सामाजिक उपक्रम राबविले गेले. मागील काही महिण्यांपासुन सुरु असलेला पक्षप्रवेशाचा धडाका पुन्हा जन्मदिवसानिमीत्य सुध्दा दिसला. राजेंच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधुन पेरमील्ली, मन्नेराजाराम परिसर आणि सिरोंचा तालुक्यातील कोटापल्ली परिसरातील असंख्य कार्यकर्त्यांनी रुक्मिणी महालात भाजप मध्ये प्रवेश केला.!






# सोयगाव येथे म्यानसह दोन तलवारी, लोखंडी धातुचा कट्टा व दरोडा टाकण्याचे साहित्य जप्त

## सोयगाव पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी : ग्रामस्थांनी केले कौतुक

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव शहरात सपोनि अनमोल केदार यांच्या मार्गदर्शनाखाली नाकेबंदी करत असताना दि. १४/१०/२०२३ रोजी रात्री ११.०० वाजता पोलीस ठाणे सोयगाव हद्दीत मा. पोलीस अधीक्षक साहेब, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांचे आदेशाने नाकाबंदी व ऑल आऊट ऑपरेशन करणेकामी सोयगाव येथिल छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सपोनि केदार व पोलीस कर्मचारी पो.नाईक.बरडे, पो.क तायडे, पो.कों सिंघल, पो.कों कोळी, मिर्झा बेग, पो.कों खोडे, होमगार्ड सोनवणे,इंगळे,बडगुजर, नागपूरे असे बॅरीकेटींग करुन वाहनांची कसून तपासणी करीत असतांना एक ट्रीपल सीट मोटार सायकल येताना दिसली असता त्यांना विचारपूस करत असताना तिघे ईसमवर कायदेशीर कारवाई करीत असतांना फर्दापूरकडुन सोयगावकडे एक पांढरे रंगाची बोलेरा जिप क्रं. एम.एच.४७ ए ३२०८ आली असता तिला थांबवून बोलेरो जीप तपासणी करीत असतांना वाहनांचे कागदपत्रे तपासत असतांना त्याचेतील चार इसम वाहनाचे खाली उतरले व चालकास सपोनि अनमोल केदार यांनी कसून तपासणी करत विचारपूस करत असतांना पो.कों सिंघल हे वाहनातील सिटच्या पायाशी असलेल्या मॅटच्या खाली पाहणी केली असता तेथे तलवारी आढळुन आल्याने सिंघल यांनी बाजूला कारवाई करीत असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवाज दिला असता खाली उतरलेले चार इसम तेथुन अंधाराचा फायदा घेऊन पळु लागले त्यावेळी चालकास सोबत असलेल्या स्टॉफने पकडुन ठेवले अंधारात पळुन गेलेल्या इसमांचा शोध घेतला. सदर वाहनांची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात दोन तलवारी मैंनसह, एक गावठी बनावटीचा लोखंडी धातुचा कट्टा, एक मोबाईल फोन, दोन लोखंडी पाईप, एक पिवळ्या रंगाची दोरी व मिरची पुड असे दरोडा टाकण्याचे साहित्य बोलोरो जिपमध्ये साहित्य मिळुन आले. सदर इसम हे मालाविरुध्दचा किंवा शारीराचा गुन्हा करणारे साहित्य बाळगतांना मिळुन आल्याने पो.काँ.कोळी यांचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे सोयगाव येथे पाच इसमांविरुध्द ऑर्म ॲक्ट व मुंबई पोलीस अधिनियमातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्ह्याचा तपास सपोनि अनमोल केदार  हे करीत आहे. ही पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अपर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार छत्रपती संभाजीनगर ग्रामीण व उपविभागीय पोलीस अधिकारी, डॉ. दिनेशकुमार कोल्हे उपविभाग सिल्लोड यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

# चिपळूणमध्ये उड्डाण पुलाचे गर्डर तुटले; तूर्तास काम थांबविले

आधुनिक केसरी न्यूज

**चिपळूण :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाअंतर्गत चिपळुणात उभारण्यात येणाऱ्या कोकणातील सर्वात मोठ्या उड्डाणपुलाच्या कामाला आता कुठे वेग येत होता. अशातच सोमवारी सकाळी ८.३० वाजता अचानक पुलाच्या मध्यवर्ती भागातील दोन गर्डर तुटले. यावेळी जोरदार आवाज झाला. त्यामुळे परिसरातील व्यापारी व नागरिक भयभीत झाले. याशिवाय राष्ट्रीय महामार्ग विभागाची यंत्रणा देखील हबकून गेली आहे. पावसाळ्यापूर्वी मात्र या कामी तितकेसे यश आले नाही. अजूनही एकेरी वाहतूक पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नाही. परंतु गेल्या महिनाभरात चिपळूण हद्दीत कामाचा वेग वाढला होता. विशेषतः शहरातील बहादूरशेख नाक्यातील उड्डाण पुलाच्या कामाला चांगली गती मिळाली होती.

# भारनियमन बंदबाबत संभाजी ब्रिगेडचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**सुशील गायकवाड**

**लोणंद :** शेतीसाठी आपत्कालीन भारनियमन बंद होण्याबाबत शिरवळ ता.खंडाळा येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. शाखा अभियंता यांना संभाजी ब्रिगेड कडून निवेदन देण्यात आलेले आहे. यावेळी निवेदन देताना संभाजी ब्रिगेडचे खंडाळा तालुकाध्यक्ष संतोष मालुसरे, उपाध्यक्ष  शौकत शेख, शिरवळ शहर अध्यक्ष सुजित दगडे, सुनिल गायकवाड,स्वप्नील बनसोडे,गजानन भरगुडे, किरण राऊत, महेंद्र भरगुडे, आशितोष भरगुडे, सोमनाथ भरगुडे आदी उपस्थित होते. शाखा अभियंता यांना देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, खंडाळा तालुक्यात काही दिवसांपासून आपत्कालीन भारनियमन होत आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. कृषीपंपासाठी दिवसभरात केवळ दोन किंवा तीनच तास कमी दाबाने वीजपुरवठा होतो. त्यामुळे शेतकऱ्याचे नियोजन कोलमडले असून पिके सुकू लागले आहेत. पिकांना पाण्याची निंतात गरज आहे.उभी पिके डोळ्यादेखत करपू लागली.त्यातच महावितरणने इमर्जन्सी लोडशेडिंग चालू केले आहे.मग शेतीला पाणी द्यायचं कसं महावितरणने ताबडतोब हा असंवेदनशील थांबवावा. शेती विद्युत पुरवठा आठवड्यातून ५ दिवस सुरू ठेवा. शक्यतो सकाळची विद्युत द्या. नेहमी वेळोवेळी विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकरी वैतागले आहेत. सातत्याने विद्युत फटका शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोडशेडिंग थांबवण्याची मागणी संभाजी ब्रिगेडकडून करण्यात येत आहे. तसे न झाल्यास नाईलाजास्तव आम्हाला आपल्या विरोधात न्याय मिळवण्यासाठी संविधानात्मक मार्गाने आंदोलने उभारावी लागतील व यातुन होणारे नुकसानास आपण व आपले कार्यालय जबाबदार असेल याची गांभीर्याने दखल घ्यावी. तरी तातडीने समस्या निवारण व्हावी व गैरसोय दूर करावी, अशी विनंती सुद्धा निवेदनातून करण्यात आलेली आहे.



# महाराजा अग्रेसन यांनी जीवनमार्ग दाखवला

## मनोज पवार यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे महाराजा अग्रसेन एक महान शासक होते. ते केवळ कर्मयोगी लोकनायक नव्हते, तर संतुलित आणि आदर्श समाजवादी व्यवस्थेचे निर्मातेही होते. ते समाजवादाचे संस्थापक, प्रजासत्ताकाचे संस्थापक, अहिंसेचे पुजारी आणि शांतीचे दूत होते. त्यांनी आपल्या आदर्श जीवन-कृतीद्वारे संपूर्ण मानवी समाजाला महानतेचा जीवनमार्ग दाखवला आहे, असे प्रतिपादन उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार यांनी केले. अग्रवाल समाजाचे प्रवर्तक श्री छत्रपती महाराजा अग्रसेन महाराज यांची जयंती रविवारी (दि.१५) ऑक्टोंबर रोजी कन्नड शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील अग्रवाल समाज बांधवांनी महाराजा अग्रसेन महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून बालाजी मंदिर येथून मिरवणूक काढत गजानन हेरिटेज येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. यावेळी मिरवणुकीत उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार व उद्योजिका तथा समस्येविका उर्मिलाताई पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मिरवणुकीमध्ये सहभागी असलेल्या अग्रवाल समाजातील माता भगिनींचा शहरातील समाजसेविका उर्मिलाताई पवार यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तर उद्योजक मनोज पवार यांच्या यांच्या हस्ते समस्त अग्रवाल समाज बांधवांचा आनंदमय वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेविका अनिता काकासाहेब कवडे, आकाश बोलधने यांची उपस्थिती होती. यावेळी जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रम यशस्वीतेसाठी रुपेश भारुका, यश भारुका, संगेश भारुका, गोविंद भारुका, करण भारुका, रोहित पिरथानी, तेजसा भारुका, विकास भारुका, अरुण भारुका, संजय वर्मा, धीरज अग्रवाल यांनी अथक परिश्रम घेतले. मिरवणुकीमध्ये समस्त अग्रवाल समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महानगरपालिकेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : राष्ट्रवादीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** डेंगू मृत्यूप्रकरणी धुळे महानगरपालिकेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, असे निवेदन राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने शहर पोलीस स्टेशनला देण्यात आले.

गेल्या महिन्यापासून धुळे शहरांमध्ये डेंगू रोगाणे थैमान माजविले आहे.घरोघरी डेंगूचे रुग्ण आहेत. शहरातील बहुतांशी दवाखाने डेंगू रुग्णांनी भरलेले आहेत.

या सर्व गोष्टीला महानगरपालिकेचे प्रशासन, अधिकारी, पदाधिकारी जबाबदार आहेत असा आरोप ह्या निवेदनात करण्यात आला.

शहरांमध्ये फवारणी केली जात नाही. गटारी, नाल्यांमध्ये औषधी टाकली गेली नाही. शहरात साफसफाई नाही. सर्वत्र घाण आहे. शहरात डेंगू रोगामुळे जवळपास सहा रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. धुळे शहरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रसिद्ध उद्योगपती, धर्मवीर गौरव जगताप यांचे डेंगूमुळे दुर्दैवी, दुःखद निधन झाले आहे. या सर्व मृत्यूला धुळे महानगरपालिका जबाबदार आहे. तरी शहरातील डेंगू रुग्णांमुळे मृत्यू पावलेल्या गौरव जगताप व इतर सहा जणांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या धुळे महानगरपालिकेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी राष्ट्रवादी पक्ष्याच्या वतीने करण्यात आली. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याचे शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले, राष्ट्रीय खजिनदार जोसेफ मलबारी, भानुदासलोहार, यशवंतपाटील, राजू डोमाळे, गोरखशर्मा, रईस काझी, राजेंद्र सोलंकी, नजीर शेख, दीपक देवरे, सोनू घारू, राजेंद्रचौधरी, राजेश तिवारी, मंगलदास लोहार, गोलू नागमल, समद शेख, बिलाल शेख, नजीर शेख, युसूफ शेख, चेतन पाटील शेख, रईस शेख पत्रकार, शकीला बक्ष, चेतना मोर, रश्मी घेठे, विश्वजीत देसले, रामेश्वरसाबरे, भोला सैदाने, वैभव पाटील, जयदीप बागल डॉमिनिक मलबारी आधी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# जनावरांचा बाजार सुरू करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे सोमवारी भरणारा जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे परिसरात लंपी रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे शासनाकडून सर्वत्र जनावरांचे आठवडी बाजार बंद करण्यात आले आहे. त्यामुळे वडोद बाजार येथील जनावरांचा आठवडी बाजार हा बंद करण्यात आला आहे मात्र आता लसीकरणाचे प्रमाण वाढत असून वडोद बाजार येथील जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्याची मागणी आता शेतकऱ्यांकडून होत आहे आठवडी बाजार जनावरांचा आठवडी बाजार बंद असल्यामुळे जनावर खरेदी विक्रीचे व्यवहार ठप्प झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून वडोद बाजार येथील जनावरांचा आठवडी बाजार सुरू करण्याची मागणी काही शेतकऱ्यांकडून होत आहे.

# महावितरणचे संचालक संजय ताकसांडे यांची आन्वा ३३ केव्ही उपकेंद्रास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी महावितरणतर्फे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सौर प्रकल्प उभारण्यासाठी भोकरदन तालुक्यातील आन्वा येथील ३३ केव्ही उपकेंद्राची निवड करण्यात आलेली आहे. महावितरणचे संचालक (संचालन) संजय ताकसांडे यांनी रविवारी (१५ ऑक्टोबर) या उपकेंद्रास भेट देऊन पाहणी केली. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० अंतर्गत जालना जिल्ह्यातील इतर उपकेंद्रांबरोबरच आन्वा उपकेंद्राची निवड करण्यात आलेली आहे. त्यासाठी आन्वा



ग्रामपंचायतीअंतर्गत शासनाने १०० एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेवर जवळपास १५ मेगावॅट वीज निर्मिती होणार असून संबंधित सौर कृषी वाहिनी तयार झाल्यानंतर आन्वा उपकेंद्रांतर्गत जवळपास १४ गावांतील सुमारे ४ हजार कृषिपंप ग्राहकांना दिवसा शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. या योजनेअंतर्गत प्रथम टप्प्यात जालना जिल्ह्यातील २१ उपकेंद्रांचा समावेश आहे.

संचालक (संचालन) संजय ताकसांडे यांनी उपकेंद्राची पाहणी करून सौर प्रकल्पासाठी आवश्यक विविध प्रकारची देखभाल-दुरुस्तीची कामे त्वरित पूर्ण करण्यासह अनेक उपयुक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. संचालक (संचालन) यांनी आन्व्यासारख्या दुर्गम भागातील उपकेंद्रास भेट दिल्याने सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला आणि त्यांना अजून उत्स्फूर्तपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली. यावेळी संचालक (संचालन) ताकसांडे यांच्या हस्ते उपकेंद्रात वृक्षारोपणही करण्यात आले. यावेळी जालना मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय सरग, जालना-१ विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत सोनार, भोकरदन उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रशांत नाखले, आन्वा शाखेचे सहायक अभियंता प्रदीप गव्हांडे, भोकरदन शाखेचे सहायक अभियंता प्रमोद दारकोंडे यांच्यासह आन्वा शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# आता कुक्कुटपालक शेतकरीही पुकारणार बंद..!

## करारदार कंपन्यांच्या मनमानीला चाप लावण्यासाठी शासनाचे लक्ष वेधणार

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** राज्यभरातील सुमारे नऊ लाख कुकुटपालक  शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून काारदार कंपन्यांना वैतागले असून त्यांच्याकडून होणाऱ्या एकतर्फी करारातील जाचक अटी आणि त्यामुळे कुकुटपालकांचे होणारे आर्थिक शोषण याविरोधात आता कुकुटपाक शेतकरी एकवटले असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ते आपल्या व्यावसायिक क्षेत्रात बंद पुकारनार आहेत. करारावरील पोल्ट्री व्यावसायात होणाऱ्या कंपन्यांच्या मनमानीपणाला चाप बसावा, एकतर्फी होणाऱ्या कराराच्या प्रक्रियेत सुधारणा व्हावी, पशू खाद्याच्या बॅग वर त्यातील घटकांची माहिती देण्याचा आदेश राज्य शासनाने देवूनही त्याची दोन महिने झाले तरी अंमलबजावणी नाही, ती तत्काळ केली जावी, केवळ 2200ग्रॅम वजनाच्या पक्षांच्या वजनाची विक्री ची सक्ती केली जावी, या आणि अशा विविध मागण्या व अडचणी असून करार दार कंपन्यांनी कुकुट पालक शेतकऱ्यांची स्थिती वेठबीगार्यांपेक्षाही वाईट करून ठेवली असल्याच्या निषेधार्थ कुकुटपालक शेतकरी महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेच्या माध्यमातून विभागीय पातळीवर वरील मागण्यांचे निवेदने सादर करत आहेत. मागण्यांवर निर्णय न झाल्यास कंपन्यांची खाद्य व पक्षांची गाडी राज्यभरातील रस्त्यांवर फिरू दिली जाणार नसल्याचा इशारा प्रदेशअध्यक्ष अनिल खामकर यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन राज्याचे पशुसंवर्धन मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील,राज्याचे पशुसंवर्धन  आयुक्त हेमंत वसेकर, सचिव तुकाराम मुंढे यांना देण्यात आल्याची माहिती खामकर यांनी दिली. या माध्यमातून आता कुकुटपालक शेतकरी आपल्या न्याय मागण्यांसाठी आंदोलनाच्या पवित्र्यात दिसणार असून राज्यशासनाने कूकुट पालक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्यात अशी मागणी नाशिक जिल्ह्यासह राज्यभरातील पोल्ट्री व्यावसायिक करत आहेत.

निवेदनात दिलेल्या मजकुरानुसार कुकट पालक शेतकरी कंपन्यांच्या मनमानीपणाला कंटाळले आहेत.त्यांच्याकडून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा फायदा घेवून शेतकऱ्यांवर एकतर्फी करारनामा लादला जातो. पक्षाचे वजन दोन किलो दोनशे ग्रॅम मान्य आहे तथापि ते तीन ते साडेतीन किलो पर्यंत नेण्यास सक्ती केली जाते.ही बाब एफसीआर म्हणजेच फीड कंझमशन रेशो कास्ट मध्ये बसत नही म्हणून करारदार शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. व ते सहन करावे लागते. विशेष म्हणजे राज्य शासनाने दोन महिन्यांपूर्वी पशुखाद्य मध्ये कोणकोणत्या घटकांचा समावेश आहे  कंपन्यांनी सदर माहिती बॅग वर टाकली जावी असे आदेश देवून कोणत्याच कंपन्यांनी राज्य शासनाचे आदेश पाळले नाही. कर्ज काढून अनेकांनी पोल्ट्री शेड बांधले आणि शेती पूरक व्यवसायात ते आले आहेत. एकीकडे ग्रामीण भागात बेरोजगार शेतकऱ्यांना शासन कुकुटपालन करण्यासाठी प्रोत्साहित करत असताना दुसरीकडे खाजगी पोल्ट्री कंपन्या आपल्या मनमानी पणाचा कळस गाठत आहे. यासाठी पोट्री धारक शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

## जालन्यातील ८ जणांवर वीजचोरीचा गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** वेगवेगळ्या प्रकरणांत १ लाख ६७ हजार ३२८ रुपयांची वीजचोरी करणाऱ्या ८ जणांवर महावितरणने पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. सर्व आरोपी जालना शहरातील रहिवासी आहेत. महावितरण थेट पोलिसांत गुन्हे दाखल करत असल्याने वीजचोरांत खळबळ उडाली आहे.

सर्व्हिस वायरवर आकडा टाकून मोदीखाना येथील गोमोदराव दामोधर पाटोळे याने ७५०० रुपयांची, शाम शामकर आढेकर याने १०१४० रुपये व अमित किशोर आढेकर याने ६३३० रुपयांची वीजचोरी केली. योगेशनगरमधील रहिवासी अमोल अशोक घोरपडे याने आकडा टाकून ७०२९ रुपयांची वीज चोरून वापरली. याच परिसरातील गावंजी विठ्ठल घोडे याने आकडा टाकून ९५४९ रुपयांची, सचिन अचितराव पवार याने ५२०२४ रुपयांची वीजचोरी केली. राजपूतवाडीमधील संदीप गणेशसिंग ताजी याने आकडा टाकून १५८५६ रुपयांची वीजचोरी केली. नवीन मोंढ्यातील रहिवासी शेख बाबा शेख बाबू याने मीटर बायपास करून ५८९०० रुपयांची वीजचोरी केली. सर्व आरोपींवर सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भारनियमन करून वीज वितरण कंपनीने ओढवून घेतला रोष

### ऑक्टोबर हीटमध्ये सर्वसामान्य नागरिक होरपळून निघाले

आधुनिक केसरी न्यूज



**इगतपुरी :** तालुक्यातील वाड़ीव-हे विजउपकेंद्रातुन जवळपास पन्नास किमी अंतर मोजून  नांदगांव बु येथे सतत खंडित वीजपुरवठा होत होता. नागरिकांची होणारी अडचन लक्षात घेवून लोकनियुक्त सरपंच देवीदास मोरे यांच्या अथक पाठपुराव्यातून आज नांदगांव बु गावठानासाठी 24 तास विजपुरवठा करण्यासाठी मंजूरी मिळाली असून या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ आज माजी सरपंच विलास पागेरे, सरपंच देवीदास मोरे यांचे हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. केंद्र सरकारच्या ग्रामीण भागातील आर डी एस एस योजनेतून हे काम मंजूर झाले आहे. त्यासाठी सरपंच मोरे यानी सतत पाठपुरावा केला होता. यासाठी वाड़ीव- हे वीज उपकेंद्र अभियंता धवल आगरकर व इतर अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले असून यांतर्गत ग्रामीण भागातील विबिध गावे व पाड़े 24 तास विज पुरवठा करुण उजळनार आहेत.

मात्र दुसरीकडे काल शनिवारी संपूर्ण देश भारत पाकिस्तान क्रिकेट सामना बघण्यासाठी आतूर आस्ताना इगतपुरी तालुक्यातील क्रिकेट शौकीन वीज वितरण कंपनी विरोधात  रोष व्यक्त केला आहे.

गेल्या पांच दिवसांपासून तालुक्यातील सर्वच फीडर वर भारनियमन आणि ते पन कुठलीही पूर्व सूचना न देता बारा बारा तास करण्यात येत आहे. त्यामुळे ऐन ऑक्टोम्बर हिट मध्ये सर्वसामान्य नागरिक होरपळून निघाले आहेत. तालुक्यातील मोठ भौगोलिक क्षेत्र वनविभागात येते. त्यामुळे हिस्त्र जंगली जनावरे या भागात वावरत असतात. रात्री अपरात्री महिला, पुरुष, सगळेच घबरलेले असतात. यावर कुणीही आवाज उठवत नसल्याचे दिसुन येते.

दरम्यान जानोरी व परिसरातील मळे विभागात देखील ही योजना मंजूर झाली असून लवकरच कामाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती आगरकर यानी दिली.

यावेळी केंद्रसरकारच्या आरडीएसएस योजनेचे जिल्हा समन्वयक तायड़े, लोकनियुक्त सरपंच देवीदास मोरे, माजी सरपंच हिरामण गायकर  दिनू गायकर, ग्रा पं सदस्य अशोक गायकर, शरद पागेरे, तंटामुक्त अध्यक्ष विलास पागेरे सामाजिक कार्यकर्ते भरत गायकर गायकर,पप्पू आहेर आदिं सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## गोंडवाना विद्यापीठाचा मानव तस्करी विरोधातील वॉक फॉर फ्रीडम पदयात्रेत सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार गडचिरोली जिल्हा विधी सेवा प्राधीकरण विभाग आणि व्हीजन रेस्क्यू संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मानव तस्करी विरोधात जनजागृतीसाठी वॉक फॉर फ्रिडम या मुक पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेची सुरूवात सकाळी ७ वाजता जिल्हा विधी सेवा कार्यालया पासून झाली त्यात गोंडवाना विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी तसेच विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग , विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये यांनी सहभाग घेतला तत्पुर्वी एक प्रतिज्ञा घेण्यात आली तसेच गडचिरोली जिल्हा विधी सेवा प्राधीकरण न्यायाधीश आर आर पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले व पदयात्रेला झेंडी दाखवून ही पदयात्रा अत्यंत शांतता आणि शिस्तबद्धतेत सुरू झाली.

जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. आर. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि मानवी तस्करी कशा स्वरूपात आज समाजात घडत आहे त्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी होत असलेल्या विविध प्रकारच्या व विविध हेतूच्या मानव तस्करीच्या घटना सांगत या सामाजिक ज्वलंत प्रश्नांविषयाची जाणीव ठेऊन कठोर पाऊले उचलण्याची गरज समजाऊन सांगितली. त्यांनी सर्व उपस्थित विद्यार्थी आणि कर्मचारी यांना मानव तस्करी विरोधात योगदान देण्यासाठी शपथ दिली. या प्रसंगी व्हीजन रेसकू संस्था, मुंबई यांच्या वतीने तुलना देवगडे,गोंडवाना विद्यापीठाचे रा. से यो संचालक, डॉ. श्याम खंडारे, कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आर. जावरे व शहरातील विविध महाविद्यालयातील इतरही कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. ही रॅली गडचिरोली



शहरातील वेगवेगळ्या महाविद्यालयांसोबत एकरूप होऊन जिल्हा न्यायालय परिसर येथून आयटीआय चौक व नंतर पुढे एलआयसी चौक मार्गे परतीच्या दिशेने पोलिस संकुल जवळून जिल्हा न्यायालय परिसर येथे येऊन थांबली व न्यायालय परिसरात रॅलीची सांगता झाली.

## अद्याप पोलिसांकडून गस्त सुरू नाहीच

### त्या भुरट्या चोरट्यांकडून ठिकठिकाणी चाचपणी

आधुनिक केसरी न्यूज


**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात त्या भुरट्या चोरट्यांकडून अनेक ठिकाणी चाचपणी ( पाहणी ) करुन चोरी केल्याचे चर्चेतुन समोर येत आहे. तर त्यामुळे भिती दहशत निर्माण झाली असले तरी पोलीसांकडून गस्त सुरु न झाल्याने नागरिकांना असुरक्षित वाटत असल्याचे बोलल्या जात आहे. गत गुरुवारी भुरट्या चोरट्यांकडून सावंगी व इतर ठिकाणी बारा एक वाजेच्या दरम्यान चोऱ्या करण्यात आल्या ते परफेक्ट चोर नव्हते ते भुरटे चोर होते आता सिद्ध होत आहे.चोरट्यानी प्रथमता रवि अधिकार यांच्या घराबाहेर पुड्या खालल्य तद्नंतर आपला मोर्चा निरंकारी कॉलनी मधे वळवला येथे एसबी नलावडे यांच्या घराकडे आले खरे परंतु तेथे आवाज ऐकु आल्याने त्यांनी डॉक्टर गवळे यांच्या घरी कडीकोंडा तोडून मागून घरात प्रवास मिळवत सोने चांदी रोख रक्कम पळवली तर त्या पुढे रेल रस्त्याकडे मोर्चा वळवत एका व्यक्तीस मारहाण केली व त्या पुढे रेल गाव ऐवजी भुरट्या चोरांनी इंदापूर गाव गाठुन चोरचा प्रयत्न केला व ठिकठिकाणी चाचपणी करत किरकोळ चोऱ्या केल्या  भुरटे चोरटे हे स्थानिकच असण्याची दाट शक्यता आहे. मात्र ठिकठिकाणी भुरट्या चोरट्यांनी चोऱ्या केल्याने गाव व शेता लगत शेतवस्त्या राहत असलेल्या नागरिकात शेतकऱ्यांत भिती निर्माण झाली आहे. या प्रकारा नंतर पोलिस गस्त सुरू करण्याची मागणी नागरिकांतून झाली होती परंतु आठवडा उलटला मात्र पोलिस विभागांकडून पोलिस गस्त सुरू न झाल्याने नागरिकात भिती बसलेली आहे.  तातडीने पोलीस गस्त सुरू करावे असी मागणी नागरिकांतून होत आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद